दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे अंक -३० | सोमवार, दि.०६ ऑक्टोबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-30 | Monday, Dt.06 October 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# ५ वर्षांत मराठवाड्याचा दुष्काळ संपणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची नदीजोड प्रकल्पाची मोठी घोषणा

प्रतिनिधी । मुंबई

प्रवरानगर: राज्यातील दुष्काळ हटवण्यासाठी राज्य शासन नदीजोड प्रकल्प तातडीने राबवणार असून, यामुळे पुढील पाच ते सात वर्षांत मराठवाडा, नाशिक आणि अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यांतील दुष्काळ केवळ भूतकाळ बनेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. प्रवरानगर येथे पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांच्या अनावरण प्रसंगी ते बोलत होते.

विखे पाटलांचे 'पद्मस्मरण' आणि सहकार चळवळ

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी महाराष्ट्रात सहकाराची चळवळ रुजवली आणि डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी जल नियोजनाच्या संदर्भात जागृती केली, असे गौरवपूर्ण उद्गार काढले. महाराष्ट्र सहकाराची पंढरी आहे. या क्षेत्राच्या विकासाचे श्रेय डॉ.विठ्ठलराव विखे पाटील आणि इतरांना जाते. त्यांनी आशियातील पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरानगर येथे उभा केला, ज्याची क्षमता आता १० हजार टीपीडीपर्यंत पोहोचली आहे. ज्या-ज्या भागात सहकार चळवळ



आणि सहकारी साखर कारखाने पोहोचले, तिथे शेतकरी समाधानी झाला आणि औद्योगिकीकरणामुळे तो संपन्न झाला.

डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांचे जलसंवर्धन चळवळीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाने नदीजोड प्रकल्प राबविण्याचा निश्चय केला आहे. या प्रकल्पांतर्गत विदर्भामध्ये वैनगंगा-नळगंगा नदीजोड, तापी खोऱ्यामध्ये पाणी आणण्याचे काम आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे उल्हास खोऱ्यातून समुद्रात वाहून जाणारे ५४ टीएमसी पाणी उचलून गोदावरीच्या खोऱ्यात आणण्याचे काम सुरू आहे. पुढील पाच ते सात वर्षांत टप्प्याटप्प्याने हे संपूर्ण पाणी गोदावरीच्या खोऱ्यामध्ये आणल्यानंतर नाशिक, अहिल्यानगर परिसर आणि मराठवाड्याचा दुष्काळ भूतकाळ असेल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले.

### अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी भरीव मदत

अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना सावरण्यासाठी सरकार त्वरित आराखडा तयार करत असून, केंद्राच्या सहकार्याने लवकरच भरीव मदत दिली जाईल, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

### सहकार क्षेत्राला केंद्राची मोठी मदत

पंतप्रधान मोदी यांनी सहकाराचे महत्त्व ओळखून स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापन केले आणि त्याची जबाबदारी अमित शहा यांच्याकडे दिली, या निर्णयाचे मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले. सहकार मंत्री अमित शहा यांनी वेगाने निर्णय घेत राज्यातील सहकार क्षेत्राला बळकटी देण्यासाठी ८ ते १० हजार कोटी रुपयांची मदत दिली. साखर कारखान्यांच्या 'सर्क्युलर इकॉनॉमी' (उळीर्लीश्ररी एलेपेाू) साठी प्रयत्न करणे आवश्यक आहे आणि साखर कारखान्याचा मालक शेतकरी असल्याने शासन त्याच्या पाठीशी उभे राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

## बनावट नोटा बाळगणारा तरूण जेरबंद

प्रतिनिधी । बीड

आष्टी तालुक्यातील वाळूंज येथील एका तरूणाकडे बनावट नोटा असल्याची गुप्त माहिती आष्टी पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी सदरील तरूणास ताब्यात घेतले असता. त्याच्या जवळ पाचशे रूपयांच्या ६४ नोटा आढळून आल्या. सदरील या तरूणाने या नोटा कोठून आणल्या, याचा मास्टर माईंड कोण त्याने नोटा चलनात आणल्या आहेत का यासह अन्य तपास आष्टीचे पोलीस करत आहेत. तालुक्यात बनावट नोटा आढळून आल्याने एकच खळबळ उडाली.

प्रकाश पाराजी खाडे (वय २४ रा.वाळूंज ता.आष्टी) या तरूणाकडे बनावट नोटा असल्याची गुप्त माहिती आष्टी पोलिसांना झाल्यानंतर आष्टी ठाण्याचे प्रविण अर्जुन क्षीरसागर यांनी या तरूणाास रांजनमाता हॉटेलच्या पाठीमागे असलेल्या एका शेडमध्ये पकडले. त्याच्या जवळ जी जे ०५ एच.एक्स १८४० या क्रमांकाची दुचाकी होती. सदरील तरूणाची



झाडाझडती घेतली असता त्याच्याजवळ ५०० रूपयांच्या ६४ बनावट नोटा आढळून आल्या. या प्रकरणी प्रविण क्षीरसागर यांच्या फिर्यादीवरून आरोपी प्रकाश खाडे यांच्या विरोधात गु.र.नं. ४६५/२०२५ कलम १७९, १८० भादंवी नुसान गुन्हा दाखल करण्यात आला. या तरूणाने कुठून नोटा आणल्या, याचा मास्टर माईंड कोण, त्याने नोटा चलनात आणल्यात का, याची टोळी आहे का याचा तपास आष्टी पोलीस करत आहेत. या प्रकरणाने आष्टी तालुक्यात एकच खळबळ उडाली. दरम्यान बीडमध्येही बनावट नोटा आढळून आल्या होत्या.


## राज्यात १२ ऑक्टोबरनंतर पावसाची 'एक्झिट'

### ६ ते ८ दरम्यान पाऊस पडणार; हवामान खात्याचा अंदाज

प्रतिनिधी । बीड

पुणे : येत्या ६ ऑक्टोबरपासून परतीचा पाऊस मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात बरसेल. ६ ते ८ ऑक्टोबरदरम्यान राज्यभर ठिकठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज आहे. दरम्यान, १२ ऑक्टोबरनंतर मान्सून महाराष्ट्रातून परत फिरणार आहे, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

यंदा मान्सूनचा प्रवास भारतात आणि महाराष्ट्रात लांबला आहे. ऑक्टोबरची सुरुवात झाली तरीही मान्सून वेळेत परतलेला नाही. नवरात्र आणि दसरा पावसात गेल्यामुळे, आता दिवाळीचा सण पावसात जाणार का, अशी चिंता सर्वसामान्य



नागरिकांना सतावत होती. या परिस्थितीत हवामान विभागाने एक अत्यंत महत्त्वाची अपडेट जारी केली आहे.

ज्येष्ठ हवामानशास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुजरातमधून कोसळणाऱ्या परतीच्या पावसाचा प्रभाव मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात ६ ते ८ ऑक्टोबरदरम्यान पुन्हा जाणवेल. या कालावधीत राज्यभरात ठिकठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

दरम्यान, पुढील तीन दिवसांसाठी पावसाला पोषक वातावरण निर्माण झाले असून, विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस अपेक्षित आहे. उर्वरित भागांमध्ये पावसाची उघडीप राहील. १२ ऑक्टोबरनंतर मान्सून महाराष्ट्रातून पूर्णपणे माघार घेणार आहे. राज्यात मागील काही दिवसांपासून पावसाचा जोर कमी झाला असून, अधूनमधून हलक्या सरी येत असल्या तरी मुसळधार पावसाची शक्यता नसल्याचे होसाळीकर यांनी स्पष्ट केले आहे. हवामान विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार, मध्य भारत आणि महाराष्ट्राच्या काही भागांत ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात पावसाची शक्यता आहे.

## आधी भोसकले मग दवाखान्यात नेले

प्रतिनिधी । बीड

बीड :- बीड शहरातील मंत्री गल्ली भागात राहणार्या एका २२ वर्षीय तरूणास चाकुने भोसकल्याची घटना २ ऑक्टोंबर रोजी घडली. सदरील जखमी तरूणास रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी आरोपीस अटक करण्यात आली आहे.

विशाल आश्रुबा बेदरे (वय २२ रा.मंत्री गल्लली) या तरूणास श्रीनिवास जगन्नाथ बुरांडे या तरूणास २ ऑक्टोबर रोजी चाकूने भोसकले. यांच्यामध्ये किरकोळ कारणावरून वाद निर्माण झाला होता यामधून ही घटना घडली. जखमी बेदरे यास रूग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी आरोपी बुरांडे यासह पोलिसांनी ताब्यात घेतले.



## # फेरनिवड

### खासदार बजरंग सोनवणे यांची ग्राहक व्यवहार,अन्न व सार्वजनिक वितरण विषयक संसदीय समिती वर फेरनिवड

प्रतिनिधी । केज

बीड जिल्ह्याचे विद्यमान खासदार श्री.बजरंग बप्पा सोनवणे यांची ग्राहक व्यवहार,अन्न व सार्वजनिक वितरण विषयक संसदीय समिती वर देशातील नागरिकांच्या अन्नसुरक्षा,अन्नधान्य वितरण,सार्वजनिक वितरण प्रणाली (झऊड), ग्राहकांचे हक्क,किंमत नियंत्रण व पोषण सुरक्षा यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर काम करणाऱ्यासमितीवर नियुक्ती जाहीर झालेली आहे.या समितीच्या माध्यमातून शेतकरी, अन्नधान्य उत्पादक, ग्राहक व सामान्य जनता यांच्याशी निगडित धोरणे



ठरविण्यात येतात.त्यामुळे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या सक्रिय व परिणामकारक कार्यक्षमते मुळे जनतेच्या अपेक्षांना न्याय मिळत राहील अशा भावना यावेळी बोलताना बजरंग बप्पा सोनवणे यांनी व्यक्त केल्या.

## कपिलधार ते मानूर जाणाऱ्या दिंडीला अपघात !

### दिंडीतील महिला ठार तर चार महिला जखमी !



प्रतिनिधी । मानुर

शिरूर कासार तालुक्यातील रायमोह येथे कपिलधार ते मानूर जाणाऱ्या दिंडीला अपघात झाला असुन. शिरूर कडुन बीड कडे जाणाऱ्या पिकअप ने रविवार दि. ५ रोजी उडवले असून अपघातात एक महिला जागी ठार झाली तर चार महिला जखमी आहेत जखमी महिलांना बीड येथे हलविण्यात आले आहे.

(उर्वरीत पान २ वर)

निष्काळजीपणाचा कळस

## विजेच्या जुन्या तारा तुटून पडतायत तरी वीज वितरण कंपनीला घाम फुटेना

प्रतिनिधी । बीड

गेवराई तालुक्यातील चकलांबा येथे जुन्या तारा आहेत. या तारा वारंवार तुटून पडत आहेत. तरीही वीज वितरण कंपनी नवीन तारा बसवत नसल्याने नागरिकांत संताप व्यक्त केला जात आहे. विजेच्या तारा तुटून जीवीत हानी झाल्यास याला सर्वस्वी विज वितरण कंपनीचे अधिकारीच जबाबदार राहतील.



चकलांबा येथील बाजार पेठेमध्ये विजेची तार तुटून पडली होती. यामध्ये सुदैवाने कुठलीही जीवीत हानी झाली नाही. मात्र सातत्याने या विजेच्या तारा तुटत आहेत. तारा दुरुस्त करण्याबाबतची मागणी वेळोवेळी करण्यात आली मात्र याकडे

(उर्वरीत पान २ वर)

## सामाजिक कार्यकर्ते कैलास ठोंबरे यांच्या दर्यादिलीचे कौतुक

## दिंद्रुड येथे स्वखर्चाने विकासकामे, नागरिकांत समाधान



प्रतिनिधी । दिंद्रुड

दिंद्रुड येथे सामाजिक कार्यकर्ते कैलास ठोंबरे यांनी विविध विकास कामांचा धूमधडाका लावला आहे.येथील दोन मुख्य रस्त्यालगत असलेल्या एका रस्त्यात पडीक बांधकाम पडल्याने अनेक वर्षांपासून बंद असलेल्या रस्त्याची स्वखर्चाने त्यांनी दुरुस्ती केली.सामाजिक कार्यकर्ते कैलास ठोंबरे यांच्या दर्यादिली मुळे गावातील अनेक प्रश्न मार्गी लागत असल्याने दिंद्रुड च्या गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

येथील महादेव मंदिराकडे जाणारा मूख्य रस्ता व मारोती मंदिराकडे जाणारा मुख्य रस्त्यालगत छोटा पण रहदारीसाठी महत्त्वाच्या रस्त्यावर दोन पडीक बांधकामाचे साहित्य पडून पायवाटी इतपत दुरवस्था झाली होती.सामाजिक कार्यकर्ते कैलास ठोंबरे यांच्या निदर्शनास हि बाब काही ग्रामस्थांनी घालून हा रस्ता मोकळा करण्याची गरज असल्याचे सांगितले.ग्रांमपंचायतच्या ढिसाळ कारभारामुळे हा प्रश्न मार्गी लागत नसल्याने ठोंबरे यांनी स्वखर्चाने जेसीबीच्या साह्याने हा रस्ता दुरुस्त करत चारकाकी वाहन जाण्याईतपत रस्ता मोकळा केला.यामुळे येथून रहदारी करण्यासाठी गावकऱ्यांना शक्य होत असल्याने समाधान व्यक्त होत आहे.गावातील अनेक रस्त्यांवर पावसाळ्यात पाणी साचून झालेली बिकट परिस्थितीवर मुरुम टाकत रस्ते दुरुस्त करून माझे गाव सुंदर गाव हा संकल्प कैलास ठोंबरे जोपासत असल्याने गावातील ग्रामस्थ समाधान व्यक्त करीत आहेत.



# मराठवाडा मित्र मंडळाचे अध्यक्ष भाऊसाहेब जाधव मराठवाडा पुण्यभूषण पुरस्काराने सन्मानित

## मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शिवकुमार डिगे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन केला गौरव

प्रतिनिधी | पुणे

मराठवाडा पुण्य भूषण सोहळा समिती पूणे आयोजित २०२५ पुण्यभूषण पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन दिनांक ०४ ऑक्टोबर शनिवार रोजी सांयकाळी ६ वाजता काळे हॉल, गोखले इन्स्टिट्यूट येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.गो.बं देगलूरकर होते तर या कार्यक्रमाचे आयोजन ड दादासाहेब भोईटे,विठ्ठल कदम, ड अविनाश कामखेडकर यांनी केले.पुरस्कार सोहळ्याचे वितरण मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मा. शिवकुमार डिगे साहेब यांच्या हस्ते मराठवाडा मित्र मंडळाचे अध्यक्ष भाऊसाहेब जाधव यांच्यासह अन्य पुरस्कारर्थी

प्रमोद गिरिगोस्वामी अध्यक्ष, जिल्हा तक्रार निवारण आयोग, सातारा-सांगली,ऋषिकेश सारूक प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अकोला ,ड.धैर्यशील गाढवे साहाय्यक सरकारी अभियोक्ता, ड. मोनाली काळे शिंदे साहाय्यक सरकारी अभियोक्ता, ड. गणेश कवडे माजी अध्यक्ष फॅमिली कोर्ट बार असोसिएशन ,ड. विश्वजित पाटील माजी उपाध्यक्ष पुणे बार असोसिएशन, ड. पवन कुलकर्णी माजी उपाध्यक्ष, पुणे बार असोसिएशन,ड. भाग्यश्री गुजर-मुळे सचिव पुणे बार असोसिएशन या सर्व सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी यांना विविध मान्यवरांच्या हस्ते २०२५ चा मराठवाडा पुण्यभूषण पुरस्काराचे सन्मान चिन्ह आणि गौरव पत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक राम माने यांनी केले.पुरस्कारर्थी भाऊसाहेब जाधव सर बोलताना म्हणाले माझ्या पुरस्कार मध्ये माझा एकट्याचा वाटा नसून माझ्या पत्नीचा बहुमूल्य वाटा आहे पुढे बोलताना आपल्या गावाकडचे काही किस्सेही त्यांनी सांगितले. जेव्हा मी पुण्यात आलो तेव्हा मला अनेक अडचणीना सामोरे जावा लागले. माझ्या शौषणिक जीवनातील विविध अनुभव त्यांनी प्रेक्षकांसमोर मांडले आणि हा मिळालेला पुरस्कार हा माझा नसुन हा तुम्हा सर्वांचा पुरस्कार आहे असे बोलून कृतज्ञता व्यक्त



केली. न्यायमूर्ती मा. शिवकुमार डीगे सर आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले, सम्राट नेपोलियनच्या कारकीर्दी मध्ये अशक्य हा शब्द कधीच वापरला नाही.त्याच प्रमाणे मराठवाडा मित्र मंडळाचे अध्यक्ष भाऊसाहेब जाधव सर यांनी ही मराठवाड्यातील गरीब व गरजूवंत होतकरू विद्यार्थ्यांना मदत करताना व विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवताना नाही शब्द हा कधीच वापरला नाही .यामुळे मराठवाड्यातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच राहण्याच्या जेवणाच्या व इतर समस्याही सुटत गेल्यामुळे मराठवाड्यातील हजारो विद्यार्थी पुण्यामध्ये शिक्षण घेऊ शकले व ते सर्वजण वेगवेगळ्या पदावर आहेत. सरांनी आधार वडा प्रमाणे मराठवाड्यातल्या विद्यार्थ्यांना पुण्यामध्ये मायेची सावली दिली. जे विद्यार्थी जाधव सरांच्या संपर्कात आले नसते तर ते विद्यार्थी आज आपल्याला तज्ञ दिसले नसते, सेलू सारख्या छोट्या गावातून सुरू केलेला प्रवास इथ पर्यंत सोपं नव्हता . ज्या ठिकाणी सरकार मदतीसाठी पोहोचू शकत नाही ते मराठवाडा सारख्या सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था करतात. एखाद्या सुपरहीट चित्रपटात आमीताफ बच्चन सारखे हिरो हे चित्रपटसृष्टीतील पडद्यावरचे नायक असले तरी जाधव सर हे सामाजिक क्षेत्रातील मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी खरे नायक आहेत.

जाधव सरांनी पुण्यात शिक्षण घेण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पैसे नसलेल्या गावी परतणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना मदत करून आधार दिला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. जाधव सरांना आणि अन्य सत्कार मुर्ती यांना न्यायमूर्ती डीगे यांनी शुभेच्छा दिल्या.ड अविनाश कामखेडकर आपले मत व्यक्त करताना आपल्या महाविद्यालयीन जीवनातील काही जुन्या आठवणींना उजाळा देत सांगितले की मराठवाडा महाविद्यालयात शिक्षण घेत असताना घडल्याले काहीं जुने किस्से सांगून यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. डॉ. गो.बं देगलूरकर या कार्यक्रमाचा अध्यक्ष समारोप करताना म्हणाले सातवाहन काळापासून ते यादवांच्या काळापर्यंत जितके राज्यकर्ते झाले, त्या सर्वांच्या राजधान्या मराठवाड्यात होत्या. 'यथा राजा, तथा प्रजा' या उक्तीप्रमाणे त्यांनी निर्माण केलेली संस्कृती संपूर्ण महाराष्ट्रभर पसरली. एकेकाळी असा वैभव असणाऱ्या मराठवाड्यात आता पुन्हा इतिहासाची पुनरावृत्ती होत आहे. भाऊसाहेब जाधव आणि त्यांच्या कार्याकडे पाहिले की त्याची प्रचिती येते. गोदावरीचे पाणी प्यायलेला मनुष्य मागे राहणार नाही.मराठवाड्याने अनेक संतांचे कार्य पाहिले. 'एक एका साह्य करू, अवघें धरू सुपंथ' असे कार्य करणारी माणसे इथे उभी राहिली. मराठवाड्यातील माणसे भांडत नाहीत, हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. विदर्भाने भांडून आपला हक्क मिळवला. मात्र, मराठवाड्याकडे नेहमीच दुर्लक्षच होत गेले.या देशाला मराठवाड्याने अनेक कर्तृत्ववान माणसे दिली. त्यात गुजरात राज्याच्या किनारपट्टीवरील लोथल आणि बेट द्वारका यांच्यासारख्या महत्वाच्या पुरातत्व स्थळांचा शोध लावणारे एस. आर. राव यांच्यासारख्या व्यक्तींचा समावेश होतो. अशी अनेक रत्ने मराठवाड्याने दिली आहेत. त्यामुळे मराठवाड्याला मागास समजण्याचे कोणतेही कारण नाही. आता आपण मागासलेले नाहीत असे मत व्यक्त केले.यावेळी उपस्थित लातूरचे डीजीपी संतोष देशपांडे , पिंपरी चिंचवडचे सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांच्यासह मराठवाडा मित्र मंडळाचे पदाधिकारी, कर्मचारी , विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाची सांगता स्वागत गीताने करण्यात आली.

## संपादकीय

### दिवाळीपूर्वी नुकसान भरपाई

गत काही महिन्यांत राज्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे शेतक-यांच्या झालेल्या प्रचंड नुकसानीसंदर्भात राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वाचा आढावा घेण्यात आला. या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधताना मोठी घोषणा केली. प्राथमिक अंदाजानुसार राज्यात सुमारे ६० लाख हेक्टर शेतजमिनीवरील पिकांचे नुकसान झाले असून, नुकसानग्रस्त शेतक-यांना दिवाळीपूर्वी थेट त्यांच्या बँक खात्यात मदत वितरीत करण्याचे राज्य सरकारने ठरवले आहे. नुकसानीचे प्रमाण मोठे असल्याने पुढील दोन ते तीन दिवसांत संपूर्ण आकडेवारी जमा झाल्यानंतर पुढील आठवड्यात सर्वसमावेशक मदतीचे धोरण जाहीर केले जाईल, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. या धोरणामध्ये केवळ पीक नुकसानीसाठीच नव्हे, तर जमीन खरवडून गेलेल्या शेतक-यांसाठी, विहिरींच्या नुकसानीसाठी आणि घरांच्या पडझडीसाठीही मदत दिली जाईल.

ऑगस्ट महिन्यापर्यंत झालेल्या नुकसानीसाठी सरकारने यापूर्वीच २२१५ कोटी रुपये वितरीत करण्यास सुरुवात केली आहे. ही मदत देण्यासाठी ई-केवायसीची अट रद्द करण्यात आली असून शेतक-यांच्या शेतात नोंद आहे, त्याप्रमाणेच मदत दिली जाईल. राज्यात अनेक ठिकाणी शेतकरी आणि विरोधी पक्षांकडून सातत्याने 'ओला दुष्काळ' जाहीर करण्याची मागणी होत आहे. यावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, धोरणात ओला दुष्काळ असा कोणताही उल्लेख नाही आणि आजपर्यंत कधीही ओला दुष्काळ जाहीर झालेला नाही. मात्र, मंत्रिमंडळाने असा निर्णय घेतला आहे की, जेव्हा जेव्हा दुष्काळ जाहीर होतो, तेव्हा ज्या सर्व उपाययोजना आणि सवलती बाधित नागरिकांना मिळतात त्या सर्व सवलती या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागातही लागू करण्यात येतील. केंद्राच्या मदतीबाबत मुख्यमंत्री म्हणाले, केंद्र सरकारकडून पूर्ण मदत मिळणार आहे.

मात्र, वारंवार प्रस्ताव पाठवता येत नसल्याने, नुकसानीचा संपूर्ण आढावा घेतल्यानंतर एकच व्यापक प्रस्ताव केंद्र सरकारला पाठवला जाईल. तोपर्यंत केंद्र सरकारच्या मदतीची वाट न पाहता, राज्य सरकार स्वत:च्या निधीतून तातडीने आवश्यक ती मदत शेतक-यांना देणार आहे आणि नंतर केंद्रीय निधीतून त्याची भरपाई करून घेतली जाईल. राज्यातील अतिवृष्टीमुळे शेतक-यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून सर्वच स्तरांतून मागणी होत असतानाही राज्य सरकारने अद्याप मदत जाहीर केलेली नाही. याविरोधात काँग्रेस रस्त्यावर उतरणार आहे. अतिवृष्टीग्रस्त व पूरग्रस्तांच्या मदतीच्या मागणीसाठी काँग्रेस शुक्रवारी राज्यभरात आंदोलन करेल, अशी माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली. अतिवृष्टी आणि महापुरामुळे सर्वकाही वाहून गेल्याने अडचणीत आलेल्या शेतक-यांना तातडीने मदत देण्याची मागणी राष्ट्रीय स्वयंसेवक परिवारातील भारतीय किसान संघाच्या पदाधिका-यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन बाधित शेतक-यांचे तीन लाखांपर्यंतचे कर्ज माफ करण्याची मागणी केली. बाधित थकबाकीदार शेतक-यांना उधारीवर शेती करावी लागली आहे. अशा सर्व शेतक-यांना हेक्टरी किमान ५० हजार रुपये मदत दिली जावी, अशी मागणीही किसान संघाने केली. व्यापा-यांच्या संगनमताने शेतमालाला हमीभावापेक्षा कमी दर मिळत आहे.

त्यामुळे सर्व खरीप पिकांची खरेदी पीएम-आशा योजनेअंतर्गत शासनाने त्वरित सुरू करावी, त्यासाठी असणारी नोंदणीची अट रद्द करावी, अशी मागणीही किसान संघाने केली आहे. राज्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे शेतक-यांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांकडून सातत्याने 'ओला दुष्काळ' जाहीर करण्याची मागणी केली जात आहे. मात्र, मुख्यमंत्री फडणवीस यांनी नियमावलीत ओला दुष्काळ ही संकल्पनाच नसल्याचे म्हटले आहे. मुख्यमंत्र्यांच्या या भूमिकेवर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी टीका केली असून फडणवीस विरोधी पक्षनेते असताना त्यांनी लिहिलेले पत्र दाखवून जोरदार टीकास्त्र सोडले आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनीही १६ ऑक्टोबर २०२० रोजीचे फडणवीस यांचे पत्र ट्वीट करून शब्दांचा खेळ थांबवण्याची मागणी केली आहे. त्या पत्रात फडणवीस यांनी परतीच्या पावसाने मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये झालेल्या प्रचंड नुकसानीबाबत तातडीने मदत देण्याची मागणी केली होती.



## उमेद कर्मचाऱ्याच्या मारहाणीचा संघटनेकडून निषेध

प्रतिनिधी | बीड

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान अंतर्गत कार्यरत गेवराईचे प्रभाग समन्वयक अशोक तारगे यांना केलेल्या मारहाणीच्या निषेधार्य उमेद कर्मचारी संघटनेच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. घटनेच्या वतीने जिल्हाधिकारी व बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देऊन कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान अंतर्गत अशोक तारगे प्रभाग समन्वयक गेवराई हे कर्तव्यावर असताना गेवराई पंचायत समिती येथे कार्यरत आहेत. त्यांना पंचायत समिती परिसरात अचानक त्रयस्थ व्यक्ती कडून मारहाण करण्यात आली आहे. या घटनेच्या निषेधार्थ, जिल्हा संघटने वतीने जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड व सर्व गट विकास अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना निवेदन देण्यात आले. त्यावेळी बीड जिल्हा संघटना अध्यक्ष कुणाल मुंडे, बीड जिल्हा संघटना सचिव श्रीमती सुप्रभा खेडकर, बीड जिल्हा संघटना कोषाध्यक्ष जीवन धापसे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.



## कपिलधारवाडी ग्रामस्थांनो,धीर सोडू नका खचू नका - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

प्रतिनिधी | बीड

जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कपिलधारवाडी या ठिकाणी अक्षरशः अख्खे गावच स्थलांतरीत करावे लागल्याची दुर्दैवी वेळ आली आहे. घराला तडे गेले, भिंती पडल्या, रस्ते खचले, पहावे तिकडे भेगा पडल्याचे चित्र असून गावकरी भयभीत झाले आहेत.

शनिवारी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी कपिलधारवाडीला भेट देऊन पाहणी करत धीर सोडू नका, खचू नका म्हणत याबाबतीत मी स्वतः लक्ष देऊन लवकरात लवकर जागा उपलब्ध करून घेऊन पुनर्वसनासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगून गावकर्यांना धीर दिला. कपिलधारवाडीला अक्षरशः निसर्गाचा कोपच झाला आहे. प्रत्येक घराला तडे गेले, भिंती पडू लागल्या, रस्ते खचू लागले, गावकरी भयभीत होऊन घरातील वस्तू हातात घेऊन कपिलधार मंदिराकडे स्थलांतरित झाले. शंभर उंबर्याचे असलेले हे गाव ५०० ते ६०० लोकसंख्या असून ज्यामध्ये महिला-पुरुष आणि लहान लेकरांचा समावेश आहे. आयुष्यभर कष्टाने पै-पै करून कमावलेल्या संसाराला सोडून घरादारासहित महिला वृद्ध गाव सोडून निघून गेले आहेत. अशा संकटात फोटोसेशन करून आश्वासन देणार्यांपेक्षा जयदत्त अण्णाच आपले पुनर्वसनाचे काम करू शकतात अशी खात्री या गावकर्यांना झाली. भयभीत असलेल्या गावकर्यांनी माजी मंत्री क्षीरसागर यांची भेट घेऊन याबाबतीत आपण लक्ष घालण्याची विनंती केल्यानंतर रात्र झालेली असताना देखील त्यांनी कपिलधार वाढीच्या ग्रामस्थांना धीर दिला. खचून जाऊ नका धीर सोडू नका असे सांगून याबाबतीत आपण प्रयत्न करत असल्याचे सांगून जमेल त्या पद्धतीने मदत करण्याचे आश्वासन गावकर्यांना दिल्यानंतर प्रत्येकाचा चेहरा खुलला होता. उपस्थित असलेल्या लहान लेकरांना आणि वृद्धांना बघून अक्षरशः डोळ्यात पाणी यावे अशी परिस्थिती आहे. यावेळी दिनकर कदम, चंद्रसेन नवले, विलास बडगे, अरुण डाके, नानासाहेब काकडे, सखाराम मस्के, ह.भ.प.हरिदास जोगदंड, अरुण बोंगाणे, शिवाजी भुरे, बाळू मिटकरी, अशोक राऊत, केशव शिंदे, अच्युत रसाळ यांच्यासह गावकरी उपस्थित होते.

पान १ वरुन...

**विजेच्या जुन्या तारा....**

संबंधित विभागाचे इधकारी दूर्लक्ष करत आहेत. या तारांमुळे जिवीत हानी होऊ शकते. जिवीत हानी झाल्यास याला सर्वस्वी विज वितरण कंपनीचे अधिकारीच जबाबदार राहतील, असा इशारा गावकर्यांनी दिला आहे.

**कपिलधार ते मानूर ....**

कपिलधार ते मानूर पायी दिंडी सोहळा दरवर्षीप्रमाणे याही वर्षी रायमोह येथे दि.४ रोजी शनिवारी मुक्कामी होता दिंडीमध्ये एकूण ७० ते ८० भाविक आहेत रविवारी पहाटे चार वाजता रायमोह इथून दिंडी सोहळा पायी चालत शिरुरकडे निघाला, येथील शिवाजी चौकातून अर्धा किलोमीटर अंतरावर जाताच .शिरूर ते बीड जाणाऱ्या पिक अप क्र. चक-१२ ड्ढ- ८५ ८८ हे वाहन घेऊन जाणारे चालक मिनीनाथ खताळ वय ४५ वर्ष याने उडवले असून राजश्री संतोष घेवरे वय ४२ वर्ष, रा. मंत्री कंस्ट्रक्शन जुना मोंढा बीड या जागीच ठार झाल्या असून यांचे शवविच्छेन रायमोह ग्रामीण रुग्णालयात झाले आहे.

जखमी असलेल्या अरुणा उमेश कळमकर वय ३६ वर्ष रा.शनिवार पेठ बीड, रुक्मिणी अमरनाथ कळमकर वय ४४ वर्ष रा. शनी मंदिर गल्ली पेठ बीड, सुमन सिद्धेश्वर चिपाडे वय ३९ वर्ष रा. हिवरसिंगा ता.शिरूरका. जिल्हा बीड या गंभीर जखमी आहेत. वैष्णवी पशुपती भुरे वय १६ वर्ष रा. कालिका नगर बीड यांना पुढील उपचारासाठी बीड येथे हलविण्यात आलेले आहे .अपघाताची माहिती मिळताच पाटोदा पोलीस स्टेशनचे पो. नि. तागड साहेब रायमोह येथील चौकीचे पो.म.रवी उबाळे ,भागवत खूपसे यांनी घटनास्थळी धाव घेतली.

### अभिनेत्री प्राजक्ता माळी हिच्या हस्ते प्रकाशित झालेला अन् तिचेच

# कव्हर असणारा दिवाळी अंक भेट देताच आश्चर्याचा सुखद धक्का!



### आष्टी वार्ताहर दिवाळी अंक २०२५ च्या अंकासाठी अभिनेत्री प्राजक्ता माळीच्या शुभेच्छा!

शुक्रवारी प्राजक्ता माळी जामखेड शहरात एका कार्यक्रमासाठी मंचावर उपस्थित राहिल्यानंतर ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, डिझायनर आकाश डोंगरे, निलेश दिवटे, नासेर पठाण, वसंत सानप यांच्यासह पत्रकारांनी तिची भेट घेतली. अनेक विषयावर चर्चा केल्यानंतर तिने या अंकाच्या निरंतर वाटचालीबद्दल कौतुक केले. यंदाच्या आष्टी वार्ताहर दिवाळी अंक २०२५ साठी विशेष शुभेच्छा दिल्या.

प्रतिनिधी | आष्टी

महाराष्ट्राच्या मराठी चित्रपट आणि अभिनयाच्या क्षितिजावर अत्यंत सुंदर देखने व्यक्तिमत्व म्हणून झळकत असलेल्या सुप्रसिद्ध अभिनेत्री प्राजक्ता माळी हिचा मराठमोळी वेशातील सुंदर फोटो असलेल्या आष्टी वार्ताहर दिवाळी २०१४ चा अंक चक्क अचानक दृष्टीक्षेपास पडल्यानंतर प्रचंड आश्चर्याचा धक्का बसलेला या अभिनेत्रीने या अंकाचे संपादक जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांचे मनापासून कौतुक केलेच पण यंदाच्या दिवाळी अंकास शुभेच्छाही दिल्या.

निमित्त होते जामखेड येथील नगरसेवक अमितशेठ चिंतामणी यांनी आयोजित केलेल्या गरबा नृत्याच्या एका मंचावर आयोजकांनी आयोजलेल्या एका बहारदार कार्यक्रमाचे, प्रसिद्ध अभिनेत्री प्राजक्ता माळी एका कार्यक्रमासाठी शुक्रवारी संध्याकाळी मंचावर विराजमान झाली. तिचे हे देखणे रूप स्वरूप आणि अभिनय पाहण्यासाठी अख्ख्या जामखेड तालुक्यासह करमाळा, पाटोदा, आष्टी तालुक्यातील तिचे फॅन आवर्जून उपस्थित होते. विशेष म्हणजे विधान सभेचे सभापती ना. राम शिंदे हे आवर्जून उपस्थित होते. तसेच युवक तरुणी आणि ज्येष्ठ नागरिकांची ही उपस्थिती लक्षवेधी ठरत होती. या कार्यक्रमातील सादरीकरणाला प्रचंड प्रतिसाद मिळाल्यानंतर अत्यंत खुशीत असलेल्या प्राजक्ता माळी हिने आपला सुंदर नृत्य करून उपस्थित प्रेक्षकांची भूक सहजरीत्या भागवली प्रचड टाळ्या शिट्ट्यांचा गजर आणि याची डोळा हा प्रतिसाद पाहणारी अभिनेत्री प्राजक्ता तिच्या चेहऱ्यावरील समाधान आणि आनंद लपवू शकली नाही. दरम्यान, बीड जिल्ह्याच्या आष्टी येथील उपसपादक उत्तम बोडखे यांच्या अत्यंत परिश्रमातून गेल्या अनेक वर्षापासून आष्टी वार्ता दिवाळी अंक वाचकांसाठी पर्वणी असतो. २०१४ च्या दिवाळी अंकाच्या मुखपृष्ठावर गुनी अभिनेत्री प्राजक्ता माळी हिची सुदर देखणी प्रतिमा छापण्यात आली होती. तेव्हा तिच्याच शुभहस्ते या अंकाचे प्रकाशनही मुंबई येथे करण्यात आले होते.तब्बल ११ वर्षापूर्वीचा हा तिच्या सुंदर प्रतिमांचा अंक उत्तम बोडखे यांनी या मंचावर प्राजक्ता माळी हिला दाखवला आणि तिला हा अंक भेट दिला. तिच्या अनेक प्रतिमांची सुंदर प्रेम यावेळी तिला सस्नेह भेट देण्यात आली. हा क्षण तिच्यासाठी अत्यंत मौलिक आणि कुठल्याही शब्दात न मावणारा होता. या निमित्ताने जुन्या आठवणींना उजाळा मिळाला हे सांगताना ते भाऊक झाली आणि उत्तम बोडखे यांच्या या अत्यंत निरंतर, कष्ट आणि ध्यास तळमळीच्या स्वभावाला धन्यवाद दिले.

## जय भवानी नवरात्र उत्सव समिती वडवणी च्या वतीने संगीतमय गायन कार्यक्रमाचे आयोजन




प्रतिनिधी | वडवणी

आज दिनांक ०६/१०/२०२५ सोमवार रोजी कोजागिरी पौर्णिमा निमित्त नांदेड जिल्ह्यातील मुदखेड येथील सुप्रसिद्ध हरिहर संच शंखतिर्थ नांदेड गायीका कु.पुजा आईलवार व संचालक परसुराम कदम ,यांच्या सह कलाकार चा संगीतमय गायन कार्यक्रम, संगीत भजन, मराठी भावगीते, भक्तीगीते, गवळण, गण, लोकगिते, महाराष्ट्रातील पारंपरिक गायन कार्यक्रमाचे आयोजन जय भवानी नवरात्र उत्सव समिती पांढरी वस्ती वडवणी च्या वतीने आयोजित करण्यात आला आहे.वडवणी येथे संध्याकाळी ७ ते १२ वा. या वेळेत कार्यक्रम आयोजीत करण्यात आला आहे.तसेच महाप्रसाद चे आयोजन करण्यात आले आहे.तरी समस्त समाज बांधव व भाविक भक्तांने या संगीतमय कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन जय भवानी नवरात्र उत्सव समिती पांढरी वस्ती वडवणी चे पदाधिकारी मंच्छिद्र कुरकूटे, सिध्देश्वर ढवळशंक,अक्षय टकले,किरण दिवटे, अशोक बागडे,श्रीनाथ बागडे, लहु खारगे ,दिपक झाडे,आर्यन झाडे, अशोक कुरकुटे , बप्पा उजगरे, श्रीकृष्णा दावडकर,अमर सरवदे ,किरण दिंडकर, रवि कांबळे , यांनी आवाहन केले आहे.

आदर्श शिक्षक श्री चंद्रसेन पाटेकर सर व श्री अंकुश इंगळे सर यांची

# बदली व नवीन रुजू झालेल्या शिक्षकांचे स्वागत समारंभ संपन्न !!

प्रतिनिधी । जाफराबाद

शाळा व्यवस्थापन समिती व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देऊळझरी यांच्यातर्फे दिनांक ३ आक्टोंबर रोजी देऊळझरी येथील शाळेचे आदर्श शिक्षक श्री चंद्रसेन पाटेकर व अंकुश इंगळे सर यांची बदली झाल्याने त्यांना आज शाळेतर्फे निरोप देण्यात आला.जिल्हा परिषद देऊळझरी येथील श्री चंद्रसेन पाटेकर व श्री अंकुश इंगळे सर या दोन शिक्षकांचा शासन नियमाप्रमाणे बदल्या झाल्या. त्या निमित्ताने शाळेत निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.याप्रसंगी सलग बारा वर्ष सेवा करत असताना प्रत्येक कार्यक्रमातून गावकऱ्यांना प्रोत्साहित करून केले. हागणदारी मुक्त गाव, बालविवाहास विरोध, मुलींचे शिक्षण, व्यसनमुक्ती आणि सतत शाळेतील गुणवत्ता टिकवून तालुक्यात प्रथम क्रमांकावर आणण्याचे काम त्यानी केले. या कार्यास गावकऱ्यांनी उजाळा दिला.



याप्रसंगी सर्वांचे डोळे भरून आले. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना पाटेकर सर व इंगळे सर यांनी गावकऱ्यांना कोणताही भेदभाव न करता एकोप्याने राहण्याचे व्यसनापासून दूर राहण्याचे व शाळेला निरंतर सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी जाता केले. या कार्यक्रमासाठी देऊळझरी व गावचे माजी सरपंच,उपसरपंच,तंटामुक्ती अध्यक्ष ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य तसेच शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक,विद्यार्थी या सर्वांच्या उपस्थितीने कार्यक्रम यशस्वी संपन्न झाला. या कार्यक्रमाप्रसंगी चंद्रसेन पाटेकर सर अरविंद भुतेकर सर इंगळे सर तुपकर सर माजी सरपंच प्रभाकर भोपळे यांनी.मनोगते व्यक्त केली. विद्यार्थी व गावातील शिक्षणप्रेमी यांनी पण आपले मनोगत व्यक्त केले. शाळेतर्फे श्री चंद्रसेन पाटेकर सर व अंकुश इंगळे सर यांना शाल,श्रीफळ, पुष्पगुच्छ व प्रतिमा भेट देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थित सर्व मान्यवरांनी दोघेही निरोपार्थी व सत्कारमूर्ती शिक्षकांचे स्वागत केले.

तसेच ऑनलाईन संगणकीय बदलीने देऊळझरी शाळेत नुकतेच रुजू झालेले श्री संजय खरात सर व नामदेव सुतार सर यांचाही शाळेतर्फे व मान्यवरांतर्फे स्वागत करण्यात आले. बारा वर्ष सेवाकाळ बजावताना आलेले वाईट व चांगले अनुभव श्री पाटेकर सर व इंगळे सर यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.भाषणाने सर्व श्रोते गण भावुक झाले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरविंद भुतेकर सर यांनी केले व आभार प्रदर्शन श्री तुपकर सर यांनी केले,सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष.सदस्य तथा मुख्याध्यापक व सर्व शिक्षक व बंधु भगिनींनी सहकार्य केले.

## मराठवाड्यातील विद्यार्थ्यांची शुल्क माफ करावी शेतकरी पुत्रांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

प्रतिनिधी । जाफराबाद



दमराठवाड्यामध्ये परतीच्या पावसाने कहर केल्यानेअतिवृष्टी व ढगफुटी मुळे पुर परिस्थिती निर्माण झाली.त्यात शेतकऱ्यांचे अंतोनात नुकसान झाले. ऐन काढणीच्या तोंडावरच पावसाची सततधार सुरू राहील्याने मुंग ,उडिद , सोयाबीन, पाण्याखाली गेली तर कपाशीच्या बोंड्या काळ्या पडल्या असुन ऊसाला देखील याचा फटका बसत ऊस जमीनदोस्त झाला आहे. तर अनेकांच्या शेताला तळ्याचे स्वरूप प्राप्त झाल्याने शेतात सर्वत्र पाणी साचले होते.नदी काठच्या तर जमिनीच पुराच्या पाण्यात खरडून गेल्या त्यामुळे शेतातील माती देखील वाहून गेली. आत्ता या शेतकऱ्यांनी शेती कशी करावी हा प्रश्न निर्माण झाला असताना उरल सुरल शेवटच पीक समजल जाणारे तुरीचे पीक देखील पिवळे पडून वाळून जातयामुळे शेतकरी हवालदिल झालाय बँके कडून कर्ज काढून शेती करणारा शेतकरी यंदा मोठ्या संकटात सापडला असल्याने यंदा तो आपल्या मुलांची शैक्षणीक फिस देखील भरू शकत नाही. त्यामुळे सरकारने मराठवाड्यातील सर्व शैक्षणिक शाळा, महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्क माफ करावी अशी मागणी जाफराबाद तालुक्यातील शेतकरी पुत्रांनी तहसीलदार जाफराबाद मार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

त्यांनी निवेदन म्हटले आहे की,मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे या पावसामुळे प्रचंड नुकसान झाले आहे.मुल शैक्षणिक फिस व परिक्षा फिस भरू न शकल्यामुळे शिक्षणा पासून वचिंत राहतील व अशा या परिस्थितीत शेतकऱ्यांच्या मुलांना आपले शिक्षण अर्धवट सोडावे लागणार असुन सरकार ने याचा विचार करुन शेतकरी पुत्रांना दिलासा द्यावा अशी मागणी त्यांनी

निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी शेतकरी पुत्र हर्षल फदाट (बापु),प्रकाश शेळके,गोपाल बर्हाटे, सुनील फदाट यांच्यासह तालुक्यातील शेतकरी पुत्र उपस्थित होते...

## गोदावरी नदीकाठच्या शेतकऱ्यांच्या मोटारी गेल्या वाहून

प्रतिनिधी । शहागड

अंबड तालुक्यातील शहागडसह परीसरात संततधार पावसामुळे अतिवृष्टी झाली आणि महसूल कर्मचाऱ्यांच्या वतीने बांधावर जाऊन पंचनामे करण्यात येत होते. त्यामुळे आपापल्या पिकांचे झालेले नुकसान दाखवण्यासाठी धडपडत असलेला शेतकरी बांधावर होता. त्यामुळे गोदावरी नदीच्या काठावर असलेल्या विद्युत मोटारी, वायर, पाईप, सौर पंपावर चालणाऱ्या मोटारी ह्या गोदावरी नदीच्या काठावरच आहे तशा होत्या. दि. २८

रविवारी रात्री गोदावरी नदीला महापूर आला आणि शेतकऱ्यांच विद्युत मोटारी, सौर पंप मोटारी, पाईप, वायर वाहून गेले. वाळकेश्वर येथील शेतकरी सय्यद इस्माईल, मधुकर मापारी, यांची पन्नास हजार रुपये किंमतीची विद्युत पाणबुडी मोटार केबल, पाईप वाहून गेले. तर कुरण येथील शेतकरी पांडुरंग वामन राक्षे यांचा साडेसात एचपीची मोटार, केबल, वायर पाईप असा एकूण एक लाख रुपयांचे साहित्य वाहून गेले आहे. त्यामुळे अगोदर अतिवृष्टी, तद्वंतर गोदावरी नदीला महापूर,

या दोन झळा सोसत असतानाच आता या शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारीच गेल्या असल्याने त्यांचा कना मोडला असुन, ते आर्थिक संकटात सापडले आहेत. गोदावरी नदीच्या काठावर असलेल्या विद्युत मोटारी, सौर ऊर्जा पंप, वायर, पाईप वाहून गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शासनाने तातडीने आर्थिक मदत करावी अशी मागणी मधुकर मापारी, सय्यद इस्माईल, पांडुरंग राक्षे या शेतकऱ्यांनी केली आहे.

अंबड तालुक्यातील शहागडसह परीसरात संततधार पावसामुळे अतिवृष्टी झाली आणि महसूल कर्मचाऱ्यांच्या वतीने बांधावर जाऊन पंचनामे करण्यात येत होते. त्यामुळे आपापल्या पिकांचे झालेले नुकसान दाखवण्यासाठी धडपडत असलेला शेतकरी बांधावर होता.

## कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान मानवी प्रगतीला पोषक– राजेश टोपे

प्रतिनिधी । जालना

येणारे युग हे कृत्रिम बुद्धिमत्तेचे आहे. विद्यार्थ्यांनी या तंत्रज्ञानाचा अभ्यासात आणि जीवनात योग्य वापर करून स्वतःला सिद्ध करावे असे प्रतिपादन महाराष्ट्राचे माजी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मा.आ.राजेश टोपे यांनी केले.अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना यांच्या वतीने प्रथमच आयोजित कनिष्ठ महाविद्यालयीन जिल्हास्तरीय कर्मयोगी अंकुशराव टोपे वादविवाद स्पर्धा २०२५ चे उद्घाटन त्यांच्या शुभहस्ते संपन्न



झाले.कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते कर्मयोगी अंकुशराव टोपे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.या वेळी बोलताना आ.राजेश टोपे म्हणाले कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान हे शाप नसून वरदान आहे. ज्ञानाधिष्ठित जागतिक अर्थव्यवस्थेत कुशल मनुष्यबळाची मोठी गरज असून विद्यार्थी या तंत्रज्ञानाचा वापर करून विविध कौशल्य आत्मसात करू शकतात. आरोग्य, शिक्षण, कृषी, दळणवळण, मीडिया, उद्योग अशा सर्वच क्षेत्रांत एआयचे महत्व वाढत आहे.

त्यांनी पुढे सांगितले की वादविवाद स्पर्धा हे स्वतःला सिद्ध करण्याचे सर्वोत्तम व्यासपीठ आहे.यशस्वी होण्यासाठी बौद्धिक क्षमतेसोबत चारित्र्यसंपन्नतेची जोड आवश्यक आहे.कर्मयोगी अंकुशराव टोपे हे शिस्त, नियोजन आणि चारित्र्य यांचे प्रतीक होते. त्यांच्या नावाने ही स्पर्धा राबविणे ही गौरवास्पद बाब आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस होते. उपप्राचार्य प्रा.पांडुरंग खोजे यांनी प्रस्ताविकेत स्पर्धेचे महत्त्व स्पष्ट केले. परिक्षक म्हणून डॉ. प्रभाकर शेळके व डॉ.एकनाथ शिंदे उपस्थित होते.या जिल्हास्तरीय स्पर्धेत विविध महाविद्यालयांमधील संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. संजय पाटील,डॉ.भुजंग डावकर, डॉ.रामप्रसाद वैद्य,डॉ.कार्तिक गावंडे,डॉ.पंडित राणमाळ,प्रा. रामप्रसाद भालेकर,डॉ.सुदर्शन तारख आणि श्री.सुरेश चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. महादेव माने यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.रामप्रसाद भालेकर यांनी केले.

वादविवाद स्पर्धेचे संचालन प्रा. दादासाहेब शिंदे व प्रा. वैशाली मगरे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. दत्ता पटाईत,प्रा.प्रमोद भांदरगे, डॉ.मोहन शिंदे,डॉ.शंकर तिकांडे,डॉ.गणेश परदेशी तसेच सर्व प्राध्यापक व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

## शेतकऱ्याच्या विविध प्रश्न संदर्भात गजानन उगले यांचा चार दिवसांपासून अन्नत्याग उपोषण सुरू

### शासन-प्रशासनाने तात्काळ दखल घ्यावे- लक्ष्मण गाडेकर

प्रतिनिधी । बदनापुर

शेतकऱ्यांसाठी रात्रंदिवस मदत करणारे व धडपड करणारे गजानन उगले हे गेल्या चार ते पाच दिवसापासून जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे अन्नत्याग उपोषणाला बसले आहेत.या अगोदर त्यांनी शेतकऱ्यासाठी अनेक उपोषण केले आहे.आता शेतकऱ्यांच्या हितासाठी अन्नत्याग उपोषण चार दिवसांपासून उपोषण सुरू आहे.तसेच जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या ज्या काही मागण्या असेल त्या तत्काळ मंजूर




करण्यात यावे.अन्यथा धर्मवीर छावा संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात येईल यांची नोंद घ्यावी अशी मागणी धर्मवीर छावा संघटनेचे जालना जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण गाडेकर यानी केली आहे.

## शेतकऱ्यांचा हातातला घास गेला, सरकार कुठं झोपलंय ? राजू शेट्टींचा संताप

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे अंबड तालुक्यात अतिवृष्टीग्रस्त भागांची पाहणी; हेक्टरी रु.५० हजार मदतीची मागणी

प्रतिनिधी । अंबड

दि.४ऑक्टोबर २०२५ रोजी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी अंबड तालुक्यातील साष्ट पिंपळगाव,नाथवस्ती,आपेगाव व परिसरातील गोदावरी नदीकाठच्या महापुरग्रस्त गावांची पाहणी केली.अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची सोयाबीन,कापूस व तूर पिके पूर्णत उद्धस्त झाली असून शेतकरी अक्षरशः हातावर पोट घेऊन बसला आहे.हातात तोंडाशी आलेला घास गेला शेतकरी हतबल झाला पिकांची मातीमोल झालेली शेतं पाहताना राजू शेट्टी यांनी संताप व्यक्त केला.शेतकऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू आणि ओठांवर प्रश्न आहेत.हा फक्त नैसर्गिक नाही, तर प्रशासनाचा आपत्ती व्यवस्थापनातील अपयश आहे. सरकारने तात्काळ हेक्टरी रु.५० हजार आर्थिक मदत जाहीर करून दुष्काळ जाहीर करावा, अन्यथा रस्त्यावर उतरण्याशिवाय पर्याय नाही. पूर आणि अतिवृष्टीमुळे नदीकाठची घरे पाण्याखाली गेली जनावरांचे आणि धान्याचे मोठे नुकसान झाले आहे. आमच्या घामाचे सोने मातीमोल झाले,



हातातला घास गेला, पण सरकारकडून प्रतिसाद नाही. असा संतापग्रस्त शेतकऱ्यांनी शेट्टी यांच्याकडे व्यक्त केला. शेट्टी यांनी सर्व शेतकऱ्यांना धीर देत सांगितले स्वाभिमानी शेतकरी संघटना तुमच्या पाठिशी ठाम उभी आहे.सरकारने मदत केली नाही तर आम्ही शेतकऱ्यांच्या न्यायासाठी रस्त्यावर उतरून दिल्ली-मुंबई हादरवू.या पाहणी दौऱ्यात जिल्हाध्यक्ष सुरेश काळे, जिल्हा सचिव पांडुरंग गटकळ, तालुका अध्यक्ष राजाभाऊ खटके,उमेश पाशटै यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांनी शासनाकडे तातडीने नुकसान भरपाई देण्याची आणि पंचनामे जलदगतीने पूर्ण करण्याची मागणी केली.

## दुधना शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या आदर्श शिक्षक पुरस्काराने श्रीमती शकुंतला राखे सन्मानित

प्रतिनिधी । मंठा

मंठा येथील दूधना शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या यावर्षीचा २०२५ आदर्श शिक्षक पुरस्कार केंद्रीय प्राथमिक शाळा नूतन मंठा येथील सहशिक्षिका श्रीमती शकुंतला राखे यांना प्रदान करण्यात आला आहे विविध विषयात नाविन्यपूर्ण शिक्षण दिल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे विठ्ठल रुक्मिणी मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून विकासजी पोथरे तर अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री भगवान जायभाये होते तर प्रमुख पाहुणे म्हणून गटशिक्षणाधिकारी




श्री गोविंद राठोड गटसमन्वयक के.जी. राठोड संतोष देशपांडे, श्रीमती साधना गिर्हे,एसबिआय चे शाखाधिकारी सोपान अहीरराव,संस्थेचे विद्यमान अध्यक्ष कैलास उबाळे होते यावेळी उदय उजैनकर यांनी संस्थेचे वार्षिक अहवालाचे वाचन केले यावेळी संस्थेचे सहकारी व शिक्षक कै संजय वाघमारे यांचे नुकतेच निधन झाल्यामुळे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली यावेळी सेलू येथील प्राध्यापक यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते संस्थेने जिल्ह्यातील इतर सोळा गुणवंत शिक्षकांना देखील पुरस्कार देण्यात आला आहे या संस्थेचे सामाजिक उपक्रमामध्ये मोठ्या प्रमाणात योगदान असते.

## नानाभाऊ आपण केलेला वारकरी भक्तांचा सन्मान लक्षात राहील हिंदूधर्मभूषण नंदकिशोर जी महाराज वायाळ पाटील

प्रतिनिधी । जाफराबाद

जाफराबाद तालुक्यातील सावरखेडा गोंदण या गावी नवरात्री विशेष विजयादशमी दसरा या साडेतीन मुहूर्त पैकी एका फुल मुहूर्ताचे परम औचित्य साधून गावचे भूमिपुत्र असणारे श्री नाना भुजंगराव पाटील पंडित यांनी वारकरी सन्मान व नवरात्री प्रित्यर्थ महाराष्ट्रातील नामांकित प्रसिद्ध युवा कीर्तनकार श्रद्धेय हरिभक्तिपरायण नंदकिशोर महाराज देवकर कोपरगाव कुंभारी यांचे विशेष किर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते यावेळी गावातील संपूर्ण जय हनुमान भजनी मंडळ व वारकरी भाविक भक्तांचा सन्मान सोहळा हा विशेष आकर्षण केंद्रबिंदू ठरला सन्मानामध्ये रुमाल टोपी गंध अक्षदा बुक्का व मानाचे श्रीफळ देण्यात आले संत सांगतात की होय होय वारकरी पाहे पाहे रे पंढरी मस्तक हे चरणावरी या वारकरी संतांच्या किंबहुना संतांचे पायी हा माझा विश्वास सर्व भावेदास झालो त्यांचा या संतवचनाप्रमाणे शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणारे सामाजिक कार्यकर्ते आदरणीय नानाभाऊ पंडित यांनी सुंदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते त्यानिमित्ताने महाराष्ट्र गोरक्षण सेना समिती प्रदेशाध्यक्ष हिंदू धर्मभुषण श्री नंदकिशोर जी महाराज वायाळ पाटील यांनी नानाभाऊ आपण केलेला वारकऱ्यांचा व भाविक भक्तांचा सन्मान हा भविष्यात लक्षात राहील तत्वतः शिक्षण क्षेत्रासोबत आपल्या हातातून देव देश धर्म आणि गावाची सामाजिक सेवा घडो असे भावनिक गौरव उद्गार यावेळी व्यक्त केले यावेळी श्री नंदकिशोर महाराज देवकर श्री नंदकिशोर जी महाराज वायाळ पाटील, कैलास पाटील वायाळ, हरिदास पाटील वाया ळ ,सुभाष पाटील, खंडू पाटील, सरपंच नितीन पाटील वाया ळ, संतोष फौजी शनफड, आप्पा सुदाम वायाळ, गजानन वायाळ, पुरुषोत्तम वायाळ, रमेश उबाळे, रतन उबाळे, विनायक पालकर, गणेश पालकर ,संजय शेळके ,रामदास पंडित, हनुमान पंडित ,उपस्थितांमध्ये पत्रकार श्री पवन वायाळ ,मंगेश वायाळ, प्रवीण उबाळे, निवृत्ती वाया ळ, सोपान वायाळ ,सोपान गवळी, समाधान वायाळ सर,

यासह गावकरी मंडळी व महिला मंडळ मोठ्या प्रमाणात उपलब्ध होती



कार्यक्रमाचा समारोप भगवती जगदंबे ची आरती करून शेवटी सर्वांच्या आभार मा नेत नाना पाटील पंडित सर यांनी सर्व वारकरी भाविक भक्तांनी भोजन प्रसादी घ्यावी असे सुचित करून पसायदानाने सर्वानुमते कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# शेतकऱ्याच्या दुष्काळी मागण्यासाठी
# एकट्या वाघाने केला रस्ता रोको

**प्रतिनिधी । माजलगांव**

शेतकऱ्याच्या दुष्काळी मागण्यासाठी एकट्या वाघाने केला रस्ता रोको.तो वाघ म्हणजे श्रीराम कोरडे,फुले पिंपळगाव येथील शेतकरीपुत्र दि.३ऑक्टोबर२०२५ रोजी नॅशनल हायवे (६१) महात्मा फुले चौक, फुलेपिंपळगाव- केसापुरी कॅम्प माजलगाव या ठिकाणी झाला.

शेतकरीपुत्र श्रीराम कोरडे यांचेकडे बॅनर बनवण्यासाठी देखील पैसे नव्हते,परंतु दिलेल्या निवेदन व त्याप्रमाणे आंदोलन करायचेच असा मनस्वी ठरवलेले आंदोलन पुर्ण केले.

शेतकरी माय -बापाच्या दुष्काळाने होरपाळुन निघालेल्या सहकार्याच्या भावनेतून मदतीची हाक देणारे,त्यांची व्यथा मांडण्यासाठी विविध शेतकरी मागण्या साठी रास्तारोको करणारे शेतकरी पुत्राची लाज इज्जत ठेवली.कारण हे आंदोलन हे शेतकऱ्यासाठी असूनही एकही शेतकरी येथे आला नाही.शेतकरी मायबापाच्या



व्यथा,आक्रोश, किंकाळे बधीर,डोळे बंद करून बसलेल्या सरकारपर्यंत जातंय का नाही हाच प्रश्न या शेतकरीपुत्रा समोर आहे.

जगाच्या पोशिंद्याने त्याच्याच लेकरा- बाळांना कुटुंबांना कसे जगायचे हा प्रश्न त्याच्यापुढे पडला आहे.त्यामुळे त्याच्यापुढे आत्महत्या करण्यासारखे संकट निर्माण झाले आहे. तरी देखील केंद्र शासन व राज्य शासन या दोन्ही सरकारने गेंड्याची कातडी परिधान करून कुंभकर्ण झोपेचे सोंग करतोय कि काय असा प्रश्न या शेतकरीपुत्राला नक्कीच पडला असेल.असे जर होत असेल तर शेतकरी पुत्र कोणत्याही आजी-माजी लोक प्रतिनिधींना गावबंदी करण्यात येईल.तरी देखील मागण्या मान्य,मंजूर,पूर्ण झाल्या नाही तर त्यांना त्यांच्या निवासस्थानी स्थानबद्ध,बंद करण्यात येईल.त्यानंतरही मागण्या मान्य झाल्या नाही तर महाराष्ट्राचे मंत्रालय,मुंबई बंदी करण्यात येईल.

याची या सरकारीबाबुनी दखल घेऊन ही व्यथा मांडण्याची तसदी घ्यावी.अशी व्यथा शेतकऱ्याचा पुत्रशेतकऱ्याचा वाघ या अधिकाराने देत आहे. कारण जे तुमच्या ताटात असते ते माझ्या शेतकरी माय - बापाचे रक्तातून घामातून आणि कष्टातून आलेले आहे. याची जाणीव,आठवण असू अथवा खाल्ल मिठाला बेईमान होतो त्याच्या माती झाल्याशिवाय राहत नाही.या खुर्चीत बसलेल्या आमदार, खासदार,मंत्री यांनी लक्षात असू द्या,कारण माती आमची माय आहे.तरीदेखील आपल्या मातीचा व शेतकरी बापाचा विचार करून आपण आमच्या मागण्या मान्य मंजूर पूर्ण करावे.अशी आर्त टाहो या आंदोलन कर्त्याने केला आहे.

या आंदोलनातील मागण्या पुढीलप्रमाणे -केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी विशेष अधिवेशन बोलून ओला दुष्काळ जाहीर करून सरसगट हेक्टरी एक लाख रुपये अनुदान देण्यात यावे, शेतमजूर कामगार व संबंधित सर्व मजूर यांना पन्नास हजार रुपये मानधन देण्यात यावे, शेतकऱ्यांच्या मालाला उत्पादन खर्च + नफा यानुसार हमीभाव देण्यात यावा,ज्या ठिकाणी रस्ते व पूल पाण्याखाली गेले आहेत त्यांची उंची वाढवून गरज भासल्यास त्या ठिकाणी नवीन पुल तयार करण्यात यावे तसेच अनेक ठिकाणी पांदन रस्ते व शेतरस्ते मंजूर देण्यात यावी. पावसाळ्यामुळे अथवा अन्य कारणामुळे शेतकऱ्यांचे व शेतमजुराचे नुकसान झाले आहे.त्यांना मदत पॅकेज दिले जावे. या मागण्या मान्य जर केल्या नाहीत तर शेतकरी यांनी उत्पादित केलेला माल,धान्य भाजीपाला,दूध व अन्य कोणती वस्तूमाल बाजारात मार्केटला जाणार नाही व तसेच बाहेर देशातून राज्यातून आयात केला जाऊ देणार नाही,जोपर्यंत मागण्या मंजूर पूर्ण होत नाही तोपर्यंत.असा इशारा संबंधित सर्व प्रशासनाला या आंदोलन कर्ते शेतकरीपुत्र श्रीराम कोरडे यांनी दिला आहे.

# श्रीदत्त संस्थान बालाघाट येथे कोजागिरी पौर्णिमे निमित्त
## धार्मिक सोहळ्याच्या आयोजन



**प्रतिनिधी । बीड**

श्री दत्त संस्थान बालाघाट येथे पं. पु. ष. ब्र. श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या कृपाशीर्वादाने आणि दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवार, दि. ०६ ऑक्टोबर २०२५ रोजी आश्विन शुद्ध पौर्णिमा निमित्त भव्य धार्मिक सोहळा आयोजित केला जात आहे.

या सोहळ्याला सर्व पंचक्रोशीतील भाविकांना या उत्सवाला उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आयोजकांनी मनःपूर्वक आवाहन केले आहे. सोहळ्याचे आयोजक म्हणतात की, हा उत्सव भक्तिरसात हरवून जाण्याची आणि दत्ताच्या दर्शनाचा आनंद अनुभवण्याची सुवर्णसंधी आहे.या उत्सवात विविध धार्मिक कार्यक्रम, भजन, कीर्तन व दत्त महाराजाच्या जीवनाची माहिती देणारे प्रवचन आयोजित केले जाणार आहे. उपस्थित राहणाऱ्या भाविकांना गंगाबाई बळीराम रसाळ (मांजरसुंबा) यांच्या अन्नदानातून महाप्रसाद दिला जाणार आहे.श्री दत्त संस्थान बालाघाट तर्फे सर्वांना नम्र निमंत्रण देण्यात आले असून आयोजकांनी सांगितले की,भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या पौर्णिमेच्या दिवशी दत्ताच्या चरणी मनःपूर्वक भक्ती अर्पण करावी.

# कपिलधारवाडी ग्रामस्थांसाठी मराठी कलाकारांचा मदतीचा हात

**प्रतिनिधी । बीड**

बीड तालुक्यातील मौजे कपिलधारवाडी गावावर गेल्या काही दिवसांपासून भूगर्भीय हालचालींमुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. घरांच्या भिंतींना पडलेल्या भेगा, रस्त्यांची हानी, जमिनीचा घसरणारा भाग आणि वाढती भीती यामुळे ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. या संकटकाळात ग्रामस्थांना मानसिक तसेच आर्थिक आधाराची गरज निर्माण झाली होती.

याच वेळी कल्पतरू बीड, अखिल भारतीय नाट्य परिषद आणि मराठी नाट्य कलाकार यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामस्थांसाठी मदतीचा उपक्रम राबवण्यात आला. मुंबईहून स्वखर्चाने प्रवास करत, कलाकारांनी गावात जाऊन प्रत्येक कुटुंबाला किराणा किटचे वाटप केले.

यावेळी कलाकार ऋतुराज फडके, प्रसाद दाने, श्रेयस राजे, सौरभ पात्रुडकर, गौरव कुलकर्णी, ललित कुलकर्णी तसेच अखिल भारतीय नाट्य परिषदेचे प्रा. डॉ. संजय पाटील हे कलाकार उपस्थित होते.हे सर्व कलाकार कपिलधारवाडी या डोंगराच्या कुशीत वसलेल्या, जिथे मोबाईल



कल्पतरू बीड, अखिल भारतीय नाट्य परिषद आणि कलाकारांच्या संयुक्त विद्यमाने किराणा किटचे वाटप

नेटवर्कसुद्धा पोहोचत नाही अशा दुर्गम गावात पोहोचले. त्यांनी प्रत्यक्ष गावात जाऊन ग्रामस्थांची विचारपूस केली आणि प्रत्येक घरात मदतीचे किट वितरित केले.

कलाकारांच्या या उपक्रमामुळे फक्त वस्तुमूलक मदतच नव्हे तर ग्रामीण समाजाशी एकात्मतेचा संदेशही दिला गेला. ग्रामस्थांनी कलाकारांच्या या कार्याचे मनःपूर्वक कौतुक करत म्हटले, अशा संकटाच्या काळात मराठी कलाकार आमच्या मदतीसाठी स्वतःहून इतक्या दुर्गम ठिकाणी आले, ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.तसेच, ग्रामस्थांनी या मदत उपक्रमात सहकार्य करणाऱ्या प्रशासनाचेही विशेष आभार मानले. त्यांचे म्हणणे होते की, कलाकार इतक्या आतपर्यंत पोहोचू शकले, हे प्रशासनाच्या समन्वयामुळेच शक्य झाले.कलाकारांच्या या संवेदनशील उपक्रमामुळे ग्रामस्थांना दिलासा मिळाला असून, सामाजिक बांधिलकी, मानवतेची भावना आणि मराठी कलाकारांचा जनसामान्यांशी असलेला नातेसंबंध अधिक दृढ झाला आहे.

## उद्योजक सुमितआप्पा घुले व मंत्रालय मुख्य संपर्क प्रमुख
# नितीन जाधव यांच्यामार्फत शैक्षणिक साहित्य व साडी वाटप उपक्रम संपन्न

**प्रतिनिधी । भूम**

उद्योजक सुमित आप्पा घुले व मंत्रालय मुख्य संपर्कप्रमुख नितीन जाधव यांच्यामार्फत भूम तालुक्यात शैक्षणिक साहित्य व पाच गावांमध्ये माता भगिनींसाठी साडी वाटप उपक्रम संपन्न झाला.

भूम तालुक्यातील आष्टा,आष्टावाडी, गोले गाव, नवलगाव ,साडेसांगवी येथील अतिवृष्टी ग्रस्त शेतकरी कुटुंबातील प्रत्येक माता भगिनींसाठी दिवाळी सणाच्या निमित्ताने साडी वाटप उपक्रम हाती घेऊन सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. प्रथम आष्टा येथील जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळेत १६५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व दप्तरचे वाटप केले.यावेळी शाळेचे



मुख्याध्यापक भोसले सर,आष्टा ग्रामपंचायत माजी सदस्य चंद्रकांत (आबा) काकडे,उद्योजक सुमित आप्पा घुले, अक्षय वाडेकर,गणेश घुले, प्रशांत घावटे,सोहेल मनेर,नितीन जाधव,अंजीर गिलबिले,माऊली गिलबिले,प्रवीण जाधव,बापूराव सूर्यवंशी यांच्यासह आष्टा गावातील शेतकरी बांधव युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भूम परंडा वाशी तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे. अशावेळी आपल्या शेतकरी बांधवांच्या पाठीशी उभे राहणे आवश्यक असल्याचे मत नितीन जाधव यांनी व्यक्त केले.एक हात मदतीचा या सामाजिक भावनेतून फुल नाही तर फुलाची पाकळीच्या माध्यमातून आम्ही आमचे कर्तव्य निभावत आहोत असे उद्योजक सुमित घुले यांनी सांगितले.

आष्टा,आष्टावाडी व साडेसांगवी गोलेगाव, नवलगाव येथील माता-भगिनींना दिवाळी सणाच्या निमित्ताने साडी वाटप केले.सदरच्या साडीवाटप उपक्रमात अधिकराव माळी,सुधीर सूर्यवंशी, सुभाष तवले, अविनाश काकडे, रितेश काकडे, बळीराम घाडगे, सुरेश खरात,दत्ता (लारा) शिंदे, प्रवीण जाधव, एडवोकेट मनोज डोंबाळे, भगवान यादव यांनी परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला. या साड्या वाटप कार्यक्रम प्रसंगी वरील सर्वच गावातील माता भगिनी युवक युवती शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीड, शिरूर कासार तालुक्यात
## ६०० किराणा किटचे वाटप



**कल्पतरू, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद व मराठी कलाकारांचा उपक्रम**

**प्रतिनिधी । बीड**

कल्पतरू बीड, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद आणि मराठी नाट्यकलाकार यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.४) बीड आणि शिरूर कासार तालुक्यातील पूरग्रस्तांना मदत म्हणून ६०० किराणा किटचे वाटप करण्यात आले. घरात पाणी शिरलेल्या विविध गावांतील कुटुंबांना ही मदत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर आणि उपस्थित कलावंतांच्या हस्ते देण्यात आली.

### बीड शहरात डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या हस्ते वाटप

बीड शहरातील नाळवंडी नाका परिसर व प्रकाश आंबेडकर भागात पुरग्रस्त कुटुंबांना डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांच्या हस्ते किराणा किट वाटप करण्यात आले. यावेळी अश्विनीताई गुंजाळ, दत्ता जाधव, गोरख काळे, संगीताताई वाघमारे, शाकेरा शेख, प्रेमराज गुंजाळ यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी कलाकार ऋतुराज फडके, प्रसाद दाने, श्रेयस राजे, सौरभ पात्रुडकर, गौरव कुलकर्णी, ललित कुलकर्णी, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते भागवत तावरे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे प्रा. डॉ. संजय पाटील उपस्थित होते.या मान्यवरांच्या हस्ते हिंगणी खुर्द, जेबा पिंपरी, कपिलधारवाडी, आर्वी, मार्करवाडी, शिरापूर गात, फुलसांगवी, गाजीपूर, हाजीपूर, तरडगव्हाण, हिवरसिंगा जांब, ढोकवड, कमलेश्वर धानोरा, साक्षाळ पिंपरी, उमरद जहागीर, बहादरपूर आणि कपिलधारवाडी या गावांमध्ये किराणा किटचे वितरण करण्यात आले. यावेळी गावचे सरपंच, पदाधिकारी, कार्यकर्ते, पूरग्रस्त नागरिक उपस्थित होते.

### मैत्री प्रतिष्ठानचा मदतीसाठी पुढाकार

जेबा पिंपरी येथील ग्रामपंचायत सदस्य शौकत रशीद सय्यद यांच्या पुणे येथील मैत्री प्रतिष्ठान तर्फेही पूरग्रस्तांना साहित्य वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी सय्यद यांच्या पुढाकाराचे गावात कौतुक होत आहे.

# महाराष्ट्र राज्यातील पुरग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी मधे मदत करनारी राज्यातील पहिली बाजार समिती कृषी उत्पन्न बाजार समिती अंबाजोगाई

**प्रतिनिधी । अंबाजोगाई**

महाराष्ट्र राज्यात अतिवृष्टी झाली असल्यामुळे सर्वत्र पुरग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे. सदर परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांचे व नागरीकांचे न भरुन निघणारे नुकसान झालेले आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री महोदया यांनी केलेल्या आव्हानानुसार कृषि उत्पन्न बाजार समिती अंबाजोगाईचे कर्मचारी यांनी त्यांचे एक दिवसाचा पगार आणि उर्वरीत बाजार समितीच्या



स्वनिधीतुन देणगी स्वरुपात आर्थिक मदत करण्यांचा निर्णय घेतलेला आहे.

त्यानुसार कृषि उत्पन्न बाजार समिती अंबाजोगाईचे सभापती तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्री. राजेश्वर चव्हाण, व सर्व संचालक मंडळ, कर्मचारी या सर्वांनी पुढाकार घेऊन सर्वांचा एकदिवसाचा पगार आणि बाजार समिती स्वनिधी असे एकुण रक्कम रुपये १,००,०००/- पुरग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी या नावाने चेक क्र. ३०१ ०३४ दि.०४/१०/२०२५ रोजी माननीय आ.श्री. धनंजयजी मुंडे साहेब यांच्या कडे सुपुर्द करण्यात आला. तसेच

तसेच माननीय ना. श्री. अजित दादा पवार उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य व माननीय आ. श्री. धनंजयजी मुंडे साहेब यांचे अभिष्टचिंतन निमित्ताने कृषी उत्पन्न बाजार समिती अंबाजोगाने मार्केट यार्डातील हमाल मापडी या असंरक्षीत कामगाराचा जनता अपघात विमा बाजार समितीने काढून कै.पंडित अण्णा मुंडे पुण्यस्मरण या दिवशी माननीय आ. श्री. धनंजय जी मुंडे साहेब

# मुझे बनना है यूपीएससी टॉपर पुस्तक जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांना सप्रेम भेट

**प्रतिनिधी । बीड**

शहरातील सेवानिवृत्त प्राचार्य नवीद सिद्दीकी यांनी लिहिलेली मुझे बनना है यूपीएससी टॉपर ही पुस्तक जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांना सप्रेम भेट दिली.

यावेळी त्यांच्यासोबत इंजि. अयान शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. अयान शेख हे बी-टेक कॉम्प्युटर इंजिनीयर असले तरी ते भविष्यात आयएएस किंवा आयपीएस अधिकारी बनू इच्छितात. त्यांची ही महत्त्वकांक्षा पाहता प्राचार्य नवीद सिद्दीकी



यांनी त्यांची पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्यासोबत भेट घडवून आणली. पोलीस अधीक्षकांनी या भेटी दरम्यान अयान शेख यांना यूपीएससी करिता आवश्यक असलेली बरीच माहिती देऊन मार्गदर्शन केले. याबद्दल नवीद सिद्दीकी यांनी पोलीस अधीक्षकांचे आभार व्यक्त केले.

# स्वीडनमध्ये संशोधन कार्यासाठी आदित्य नागरगोजे यांची निवड

**प्रतिनिधी । बीड**

बीड जिल्ह्याचे मूळ रहिवासी आणि पुणे येथे सॉफ्टवेअर इंजिनियर म्हणून कार्यरत असलेले आदित्य महादेव नागरगोजे यांची स्वीडन येथे संशोधन कार्यासाठी निवड झाली आहे.ते स्वीडनला रवाना झाले आहेत.

पुणे येथे ऑडी फॉक्स्वागेन स्कोडा पोरशो मल्टिनॅशनल कंपन्यांसाठी सॉफ्टवेअर इंजिनियर म्हणून कार्यरत आहेत. सेवानिवृत्त तहसीलदार नवनाथ नागरगोजे यांचे आदित्य हे पुतणे तर आरोग्य विभागात कार्यरत असलेले महादेव नागरगोजे यांचे सुपुत्र



आहेत.अथक परिश्रम, ज्ञान आणि सकारात्मक दृष्टिकोन असल्याने अजिंक्य याने हे यश संपादन केले आहे. डॉ. महेश नागरगोजे यांच्या नंतर संशोधन व नाविन्यपूर्ण कार्य करण्यासाठी आदित्य नागरगोजे परदेशी गेले आहेत. सदर निवडीबद्दल रोहतवाडी ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).



:: लेखक ::
डॉ राजेंद्र मुरलीधर सानप
इंद्रप्रस्थ कॉलनी नगर रोड बीड

# आजचा युवक गुन्हेगारीकडे का वळताहेत ?

बीड -आज सर्वत्र समाजातील वाढत्या गुन्हेगारीच्या घटना वाढत आहेत.या गुन्हेगारी घटना मध्ये युवकांची संख्या जास्तअसल्याचे दिसते. खुन, मारामारी, भांडणाच्या वाढत्या प्रमाणामुळे होणारी हाणामारी यांचे रूपांतर कधी खुनात होत आहे. अलीकडे युवा वर्गात स्पर्धात्मक वातावरणाने गुन्हेगारी वाढत आहे. सार्वजनिक ठिकाणी युवा वर्ग टवाळखोरपणा करून शांतता भंग करणे, मुलीची छेडछाड करणाऱ्या तरूणांचे प्रमाण लक्षात घेता हा वर्ग टोकाचे वाद करून गुन्हेगारीला खतपाणी घालतात.

दुचाकी, चारचाकी वाहनांची चोरी, तोडफोड, जाळपोळ करणे, सायबर गुन्हे, एटीएम, ई-मेल, फसवे फोन कॉल, फसवे मेसेज, ऑनलाइन वस्तू खरेदी-विक्री याद्वारे केली जाणारी सर्वसामान्य जनतेची आर्थिक फसवणूक, खंडणी मागणे,मुलींची छेडछाड, बलात्कार,सिड हल्ले या सर्व गुन्ह्यांमध्ये तरुण पिढी पुढे असल्याचे दिसते. कुठल्याही किरकोळ कारणावरून वाद-विवाद, भांडण उकरून काढून एकमेकांवर प्राणघातक हल्ले करणे, जो भांडण सोडवायचा प्रयत्न करेल त्याला देखील जीवे मारण्याचा प्रयत्न करणे, गटबाजी करणे, टोळ्या बनवणे, गुन्हेगारी कारवाया करण्याचे आपले परिसर ठरवून घेणे आणि जाणाऱ्या-येणाऱ्या नागरिकांना दमबाजी करणे, त्यांचे मोबाईल, पाकीट, घड्याळ हिसकावून पलायन करणे अशा घटनांमध्येही युवकांची संख्या लक्षणीय आहे.शहरासह ग्रामीण भागात आजही छोट्या-छोट्या गल्लीबोळांमध्ये स्वतःचे विविध चित्रविचित्र अवतारातले फोटो बॅनर, होर्डिंग आणि पोस्टरवर लावण्यात पण युवा पिढी आग्रेसर आहे.विविध समाजातील थोर महापुरुष,संतमहंत,महान युगपुरुषांच्या जयंती,पुण्यतिथी, बॅनरमध्ये त्यांच्या फोटोसोबत आपला फोटो लावायला,पण कधी विचार केला काआपण एक टक्का तरी त्यांच्या तुलनेत पात्र आहोत का,हा सारासार विचार युवक करत नाही.या डिजिटल पोस्टरबाजीला राजकीय मंडळींचा वरदहस्त असल्या कारणाने, भाई, दादा,अण्णा,अप्पा, तात्या, काळीज,वाघ,सिंह,भाऊ,वादळ, जाण,शान असे विश्लेषण लावुन युवा वर्ग फुकटचे कार्यकर्ते म्हणून वापरायला मिळतात.त्याचा एक फोटो बॅनरवर टाकून त्याला कायमस्वरूपी आपला हक्काचा कार्यकर्ता बनवून घेणे हेच राजकीय मंडळींचे उद्दिष्ट असते.पण या युवा वर्गास हे सांगणार कोण ?

ज्या वयात शैक्षणिक,वैचारिक, संस्कारित, व्यावसायिक, सामाजिक कर्तृत्व दाखवून.आपली तसेच कुटुंबाची जबाबदारी स्वीकारणे अपेक्षित असते, त्या वयात हि तरूण मुलं आपले आयुष्य स्वतःच्या हाताने बरबाद करून घेताना दिसतात. काहीवेळा या तरूणांनाआई- वडिलांची हालाखीची परिस्थिती, घरातून लहानपणा पासून मिळू न शकलेले चांगले संस्कार व कुटुंबातील लहानपणापासून पाहात आलेले व्यसनाधीन व्यक्ती, नातेसंबंधातील ताणतणाव,नात्यांमधील हिंसाचार यामुळे या तरणांची लहान पणापासून मानसिकता बनलेली असते.हे तरूण ज्या परिसरात व ज्या घरात जन्माला येतात तिथे आयुष्याबाबत कोणीही सकारात्मक,चांगले, योग्य मार्गदर्शन करणारे त्यांना भेटलेले नसते.आर्थिक परिस्थिती सातत्याने दुर्बल असल्यामुळे लहानपणापासून अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा भागविण्यासाठी होत असलेल्या हाल अपेष्टा सोसून त्यांचा आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन अतिशय वेदनादायी झालेला असतो. त्यामुळे आता मिळेल तसा, मिळेल तिथून पैसा मिळवणे, आपल्या गरजा भागवणे हेच ध्येय या तरुण वर्गा समोर असते.

आजच्या परिस्थितीत दिवसें दिवस वाढणारी बेरोजगारी, उच्च दर्जाचे शिक्षण घेण्यासाठी लागणार अमाप पैसा, तेवढी बुद्धिमत्ता याचा कायम स्वरूपी आभाव, उद्योग-व्यवसाय उभे करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाची कमतरता. या सर्व पार्श्वभूमीवर मिळालेले त्याच स्वरूपाचे, त्याच परिस्थितीमधील समदुःखी मित्र आणि संगत यातून रोज रडतखडत दारिद्र्यात जगण्यापेक्षा एकदाच काय ते मोठं कांड करून पैसा कसा मिळेल.या विचाराने ही मंडळी गुन्हेगारी कडे वळताना दिसतात.कायदा सुव्यवस्था बाबतीत भीती नसणे,समाजाची कसलीही तमा न बाळगणे, निडरपणा

यातून स्वतःबद्दल वाढलेला फाजील आत्मविश्वास या पिढीचे भवितव्य उद्धस्त करीत आहे.हि परिस्थिती व त्यामागील कारणे सर्वांनाच परिचित आहेत.परंतु या सर्व बिघडलेल्या मानसिकतेमधील युवा पिढीला यातून बाहेर कस काढायचं,युवक वर्ग सैरभैर विचारांपासून परिवर्तित कसा होईलत यासाठी काही उपाययोजना राबविणे आज गरजेचे आहे.यासाठी विविध उपक्रम व धोरणात्मक भुमिका शासनाने व सामाजिक संस्थाने घेणे गरजेचे आहे.समाजाला,सर्वसामान्य माणसाला या युवा पिढीमुळे होणारा त्रास कसा कमी करता येईल,यावर युवा पिढी गुन्हेगारी पासुन दुर होईल स्वताच्या भविष्याकडे साकारात्मक दृष्टीने पाहिल.

युवक वर्गाकडे पाहताना जाणवते की जन्मजात कोणीच गुन्हेगार नसतो.पण त्याच्या भोवतालचे वातावरण व त्याला लहानपणापासून आजूबाजूला दिसलेल्या चांगल्या- वाईट घटना, संस्कार, संगत यातून तो घडतो किंवा बिघडतो.आज ज्या ठिकाणी अशा गुन्हेगारी वृत्तीचा तरुणवर्ग लहानाचा मोठा होतोय,

त्या ठिकाणी समुपदेशनाचे कार्यक्रम आयोजित करणे आवश्यक आहे.गुन्हेगारांचा अड्डा बनलेला परिसर, त्या त्या ठिकाणच्या शाळा, कॉलेज, क्लास त्याठिकाणच्या विद्यार्थ्यांना देखील जागरूक सावध करणे.त्यांचे योग्य प्रबोधन करणे आवश्यक आहे. कोणत्याही स्वरूपाचा गुन्हा घडण्याआधीच त्याला पायबंद घालण्याचा प्रयत्न करणे.किरकोळ गुन्ह्यातून कायदेशीर सुटल्यावर हे युवक जास्तच निर्ढावलेले दिसतात.पोलीस प्रशासन,कायदा, झालेली शिक्षा भोगणे अथवा या संदर्भात झालेल्या कोणत्याही कारवाईबद्दल त्यांना काहीच वाटत नाही. स्वत.अनुभव घेतल्याने कायदा, त्यातील पळवाटा यातुन .सहजासहजी

मार्ग काढू शकतो.या विश्यावासामुळे युवकांची हिम्मत वाढते.त्यामुळे अशा युवकांना प्रबोधन करणे देखील अत्यावश्यक आहे.काही अंशी आई वडील सुद्धा या परिस्थितीत बदल घडवून आणायचा प्रयत्न करू शकतात. आपल्या युवा मुलांना चांगल्या संगती,सवयी व संस्कार यांच्या बाबतीत योग्य ते मार्गदर्शन करून त्यांना वैचारिक संस्कारित विचारधारेत युवाअवस्थेत आणण्यासाठी प्रयत्न करू शकतात. आपल्या युवा मुलांचे बेस्ट फ्रेंड पालक होवु शकतात.तेच आजच्या काळात युवा पिढीला गुन्हेगारी पासुन रोखणारे आदर्श प्रेरणा देणारे एक मार्गदर्शक गुरु व सच्चे मित्र होवु शकतात.



# अंबाजोगाई येथील पत्रकार प्रशांत मस्के यांचा समाजकार्यास प्रोत्साहन देऊन वाढदिवस उत्साहात साजरा

प्रतिनिधी | अंबाजोगाई

दैनिक बीडसत्ता वृत्तपत्र चे अंबाजोगाई तालुका प्रतिनिधी प्रशांत रघुनाथ मस्के यांच्या वाढदिवसा निमित्त विविध क्षेत्रातून शुभेच्छा पत्रकार प्रशांत रघुनाथ मस्के यांनी पत्रकारिता क्षेत्रामध्ये गेल्या सात वर्षांपासून निर्भीड अशी पत्रकारिता केली आहे आणि करत आहेत त्यांच्या लेखणीने दडलेले सत्य बाहेर काढून वाचा फोडण्याचे काम केले आहे त्यांनी पत्रकारिता क्षेत्रामध्ये उत्कृष्ट अशी पत्रकारिता करताना त्यांच्या निर्भीड पत्रकारिता कार्यामुळे त्यांना पद्मपाणी राज्य स्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्काराने गौरविण्यात सन्मानित करण्यात आले आहे.संघर्ष भूमी तालुका अंबाजोगाई येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त एक एप्रिल ते चौदा एप्रिल पर्यंत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ वा सार्वजनिक जयंती महोत्सव २०२५ संघर्ष भूमी वरील होणाऱ्या विविध कार्यक्रमाचे वृत्तांकन लोकप्रिय दै. बीडसत्ता वृत्तपत्रांमध्ये बातम्या प्रसिद्ध केल्या बद्दल पत्रकार प्रशांत रघुनाथ मस्के यांना संघर्ष भूमीच्या वतीने संविधान आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित केले आणि त्यांच्या निर्भीड आणि उत्कृष्ट पत्रकारितेबद्दल त्यांना त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या त्यांनी पत्रकारिता क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्या बद्दल त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सर्वत्र क्षेत्रातून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.



# सर्वच क्षेत्रात महिलांना मोठी संधी - शरयू हेबाळकर

## रोटरी नवदुर्गा पुरस्काराचे वितरण

प्रतिनिधी | अंबाजोगाई

समाजातील सर्वच क्षेत्रात महिलाना काम करण्याची मोठी संधी आहे. त्यांनी आपल्या कार्याच्या कक्षा विस्तारल्या पाहिजेत.असे आवाहन दीनदयाल बँकेच्या माजी अध्यक्षा शरयू हेबाळकर यांनी केले.रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना अग्निशिखा रोटरी नवदुर्गा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून शरयू हेबाळकर बोलत होत्या.यावेळी व्यासपीठावर रोटरीच्या अध्यक्षा प्रा रोहिणी पाठक,सचिव मंजुषा जोशी, प्रोजेक्ट डायरेक्टर स्वरुपा कुलकर्णी,मंदाकिनी गित्ते, कल्पना मुळावकर,प्रा. डॉ.शैलजा बरूरे, यांची उपस्थिती होती. यावेळी आपल्या सत्काराला उत्तर देताना आ.नमिता मुंदडा म्हणाल्या की रोटरीने विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान करून त्यांच्या कार्याचा गौरव केला.यावेळी आपल्या प्रास्ताविकात बोलताना रोहिणी पाठक यांनी अग्निशिखा याचा अर्थ 'अग्नि' म्हणजे तेज, ऊर्जा, परिवर्तन करण्याचे साधन 'शिखा' म्हणजे उंचावणारी ज्योत.म्हणजेच

# आम्ही कराडकर यांचा पूरग्रस्त पाटोदेकरांना मदतीचा हात

प्रतिनिधी | पाटोदा

अतिवृष्टीमुळे पाटोदा परिसरातील अनेक कुटुंबांचे संसार उघड्यावर आले, शेतीतील पिकांचे नुकसान झाले, घरातील अन्नधान्य, वस्तू वाहून गेल्या. या संकटाच्या काळात आम्ही कराडकर चक्र-५० यांच्या वतीने व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पाटोदा यांच्या माध्यमातून पूरग्रस्त बांधवांना दिलासा देणारा मोठा मदत उपक्रम हाती घेण्यात आला.या उपक्रमांतर्गत पूरग्रस्त कुटुंबांना किराणा किट, भांडीसाहित्यासह संसार उपयोगी साहित्य, तसेच शालेय विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, वह्या, पेन, पेन्सिल आणि शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. मदतीचा लाभ खऱ्या गरजूंना मिळावा यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पाटोदा टीमने सुनियोजनबद्ध नियोजन करून प्रत्यक्ष पूरग्रस्त भागात जाऊन मदत





पोहोचवली.कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने करण्यात आले. पूरग्रस्त कुटुंबांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला, कारण त्यांच्या रोजच्या गरजांसाठी आवश्यक वस्तू वेळेवर उपलब्ध झाल्या. या प्रसंगी आम्ही कराडकर प्रतिनिधींनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सेवा भावाचे कौतुक करत सांगितले की,संघाच्या स्वयंसेवकांनी केवळ मदत वाटपच नाही तर पूरग्रस्तांच्या समस्या ऐकून त्यांना दिलासा देण्याचे कार्य केले. अशा संघटित प्रयत्नांमुळेच समाजात मानवतेचा संदेश पोहोचतो.या मदतकार्यादरम्यान राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पाटोदा यांचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यांनी पूरग्रस्तांच्या घरापर्यंत जाऊन त्यांची परिस्थिती पाहिली व आवश्यक मदत पोहोचवली.पूरग्रस्त नागरिकांनी भावनिक शब्दात सांगितले की,

आम्ही कराडकर व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पाटोदा यांच्या या मदतीमुळे आम्हाला जगण्याची नवी उमेद मिळाली. अशा संवेदनशील लोकांमुळेच समाजात आशेचा किरण दिसतो.कार्यक्रमानंतर परिसरात आम्ही कराडकर यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक होत आहे. संकटाच्या काळात अशा पद्धतीची संघटित आणि मनापासूनची मदत कार्यवाही ही संपूर्ण तालुक्यासाठी प्रेरणादायी ठरली आहे.

# सामाजिक कल्याण एवं मानव संरक्षण संघ पुणे यांचा पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी

## एक हात मदतीचा शैक्षणिक उपक्रम

प्रतिनिधी | आष्टी

**सामाजिक कल्याण एवं मानव संरक्षण संघ, पुणे यांच्या टीमने बीड जिल्ह्यातील पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाचा शैक्षणिक उपक्रम राबवला. संघाकडून आष्टी तालुक्यातील सांगवी (पाटण) आणि धनगरवाडी येथील शाळांमध्ये सुमारे २८० शालेय साहित्य किटचे वाटप करण्यात आले. पुणे येथून आलेल्या टीमचे ग्रामपंचायत सांगवी पाटण, जि. प. प्रा. शाळा, सुदर्शन विद्यालय व जि. प. प्रा. धनगरवाडी यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.**

या उपक्रमातर्फे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सांगवी पाटण, सुदर्शन विद्यालय सांगवी पाटण आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धनगरवाडी येथील विद्यार्थ्यांना वह्या, पेन्सिल, पेन इत्यादी आवश्यक शालेय साहित्याचे किट देऊन सन्मानित करण्यात आले. पुरामुळे प्रभावित झालेल्या या मुलांच्या शिक्षणात सुरळीतपणा यावा, हा या कार्यक्रमाचा मुख्य हेतू होता. यावेळी सामाजिक कार्यकर्ते समीर शेख यांनी उपस्थितांना संबोधित केले. त्यांनी सांगितले की, वेळेला केलेली एक छोटीशी मदत तिचे मोल अनमोल असते. पुण्य जर कमवायचे असेल तर गरजवंतांना मदत केली तर पुण्य भेटते. आपण शिवरायाचे मावळे



आहोत. माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागले पाहिजे. आपण जसा विचार करतो तसं आपण घडतो. एक हात मदतीचा उपक्रम कौतुकास्पद आहे.

हे शालेय साहित्य किट वाटप करताना संघाचे पुणे जिल्हा अध्यक्ष किशोर थोरात यांनी सांगितले, पुराच्या आपत्तीमुळे मुलांचे शिक्षण खंडित झालेल नाही, याची काळजी घेणे आपली जबाबदारी आहे. या छोट्याश्या प्रयत्नातून मुलांना शिक्षणाकडे वाटचाल करण्यास प्रोत्साहन मिळेल, अशी आशा आहे. यावेळी कार्यक्रम प्रसंगी सरपंच दत्तात्रय खोटे, सरपंच महाडिक, उपसरपंच राहुल खिलारे, लक्ष्मण भोसले, महेश खिलारे, अविनाश भोसले, पत्रकार मारुती सत्रे, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख, निलेश तरटे मुख्याध्यापक साईनाथ बोडखे, मुख्याध्यापक चांगदेव तरटे, मुख्याध्यापक वशिष्ठ तरटे सर व सर्व शिक्षक वृंद, विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते. या प्रसंगी संघाचे पुणे शहर जनरल सेक्रेटरी रविंद्र आळणे, सदस्य अमित कोकणे, अमोल भोसले, सुरेंद्र नाथ, सागर तावरी, शिक्षिका क्षमा काळे मॅडम आणि रीना शिंदे मॅडम या सर्वांचे सहकार्य लाभले. या मदतीसाठी सामाजिक कल्याण एवं मानव संरक्षण संघ, आधार शैक्षणिक संस्था, श्री समर्थ शैक्षणिक व सामाजिक संस्था, एक्सलंट इंटरनॅशनल स्कूल, अथर्व वॉटर टेक् सोल्युशन्स, अमुकेट प्रॉडक्ट्स अँड टेक् सोल्युशन आणि इतरही संस्था यांनी सहकार्य केले . संघाच्या या समाजहीत उपयोगी कार्यामुळे शाळांचे शिक्षक, विद्यार्थी व पालक यांनीही त्यांचे आभार मानले. पूरग्रस्तांसाठी एक हात मदतीचा निर्धार दाखवल्याबद्दल संस्थेचे कौतुक करण्यात आले.

# प्रा.श्री.रमेश सरवदे सर यांचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मान

## सर्व स्तरातून होतोय अभिनंदनाचा वर्षाव

प्रतिनिधी | केज

श्री.साईनगरी शिर्डी येथे रविवार दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी साई पालखी निवारा येथे बी दि चेंज फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ सोहळा मोठ्या उत्साहात व दिमाखात पार पडला.या सोहळ्यात राज्यातील अनेक गुणी व कार्यक्षम शिक्षकांचा त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल गौरव करण्यात आला.शिक्षक हेच समाजाची आदर्श पिढी घडवणारे शिल्पकार असून,त्यांच्या कार्याचा सन्मान करण्याच्या हेतूने फाउंडेशन तर्फे दरवर्षी या पुरस्काराचे आयोजन केले जाते.यावर्षीचा हा मानाचा सोहळा शिर्डीत पार पडला.

सदरील कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यानगरचे खासदार डॉ.श्री.सुजय विखे पाटील,श्री.विठ्ठल राव जपे पाटील,श्री. साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.गोरक्ष गाडीलकर,श्री. स्वरूप कापे,श्री.निखिल वामन व श्री.दीपक चव्हाण तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री.मयूर ढोकचौळे व विश्वस्त श्री.अभिषेक तुपे ईत्यादी मान्यवर उपस्थित होते.





यावेळी श्री.रत्नेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय टोकवाडी ता.परळी.वै. जि.बीड या उच्च माध्यमिक विद्यालयातील प्रा.श्री.रमेश ज्ञानोबा सरवदे सर यांना शिक्षण क्षेत्रातील,संगीतक्षेत्रातील ,सांस्कृतिक क्षेत्रातील तसेच सामाजिक क्षेत्रा तील उल्लेखनीय योगदानाबद्दल आणि विविध स्तरावर अनेक आदर्श विद्यार्थी घडविल्याबद्दल त्यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार - २०२५ हा पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.त्यांच्या कार्याची दखल घेत समाजातील विविध स्तरातून त्यांचे कौतुकहोत असून ते संगीत अध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या श्री.सोमेश्वर शिक्षण संस्था जिरेवाडी ता.परळी वैजनाथ जि.बीड या संस्थेचेअध्यक्ष श्री.गोवर्धन कांदे व संस्थेचे सचिव अँड.श्री.गोपाळराव कांदे, विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्री.प्रदीप मुंडे सर,सहकारी शिक्षक आणि शिक्षकेत्तरकर्मचारी वृंद यांनीही अभिनंदन केले.राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार-२०२५ च्या सन्मानामुळे त्यांच्या कार्याला अधिकचे महत्त्व येवून भविष्य काळासाठी प्रेरणादायी अधिष्ठान प्राप्त झाले आहे.

# नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी एकोपा महत्वाचा - रामदेवजी अग्रवाल

## जाती-पातीत, गटा-तटात विभागू नका ; जलनायक मयंक गांधी यांचे शेतकऱ्यांना आवाहन

**ग्लोबल विकास ट्रस्टचे दतृत्व; १६ गावांतील ३ हजार कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंची मदत**

प्रतिनिधी । परळी

ग्लोबल विकास ट्रस्टने जेंव्हा मराठवाडा भागात काम करण्यास सुरुवात केली तेंव्हा येथे दुष्काळी परिस्थिती होती. शेतीसाठी सोडाच परंतु पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष असलेला हा भाग होता. सामाजिक भावनेने या भागासाठी काहीतरी केले पाहिजे हा उद्देश घेऊन मयंक गांधी बीड जिल्ह्यात आले आणि त्यांनी येथे दुष्काळ मुक्तीच्या कामाला सुरुवात केली. आज त्या गोष्टीला जवळपास सात ते आठ वर्षे उलटून गेली, आता परिस्थिती आली आहे ओल्या दुष्काळाची. अतिवृष्टी झाल्याने येथील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाल्याचे आम्ही पाहत आहोत. काळ बदलतोय, संकटांचे स्वरूप बदलते आहे. आपण मात्र बदलायला तयार नाहीयेत. आपण बदलले पाहिजे बदलत्या संकटांना तोंड देण्यासाठी एकत्रपणे सज्ज व्हायला हवे. नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी शेतकऱ्यांचा एकोपा महत्वाचा असल्याचे परखड मत रामदेवजी अग्रवाल यांनी व्यक्त केले. परळी वैजनाथ तालुक्यातील मौजे परचुंडी, भिलेगाव, मलनाथपूर, सेलू तर अंबाजोगाई तालुक्यातील राक्षसवाडी येथे अतिवृष्टीग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना जीवनावश्यक किराणा किटचे वितरण करण्यात आले. मोतीलाल ओसवाल फाउंडेशन आणि बोरोसील रिन्यूबल्स यांच्या सहकार्यातून ग्लोबल विकास ट्रस्टकडून हा उपक्रम राबवण्यात आला याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमास रामदेवजी अग्रवाल, सुनीताजी अग्रवाल, सुनील जीवराजका, कुशमा जिवराजका, अनिल चंदाराणा, डॉ.हरिश्चंद्र वंगे, सेवानिवृत्त नायब तहसीलदार बाबुराव रूपनर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.



अतिवृष्टीग्रस्त तसेच पूरग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळी व दसरा आनंदात साजरा करता यावा यासाठी ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांच्या पुढाकारातून शेतकरी कुटुंबांना अन्नधान्य आणि किराणा किटचे वितरण करण्यात येत आहे. परळी आणि अंबाजोगाई तालुक्यातील १६ गावांमध्ये जाऊन ३ हजार कुटुंबांना ही मदत देण्यात येणार आहे. काही गावांत झालेल्या मदत वितरण कार्यक्रमात पुढे बोलतांना जलनायक मयंक गांधी म्हणाले की, शेतकऱ्यांनी गटातटात किंवा जातीजातीत विभक्त होऊन चालणार नाही. शेतकऱ्यांवर येणाऱ्या आपत्ती, त्यांना भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करायचे असेल तर हाती हात घेऊन शेतकरी म्हणून एकत्र राहण्याचा हा काळ असल्याचे त्यांनी म्हटले. ऐन दसरा आणि दिवाळीच्या तोंडावर शेतकऱ्यांच्या वाट्याला आलेले दुःख फार मोठे आहे. अगोदरच कर्जाच्या खाईत सापडलेला बळीराजा दिवाळीचा सण कसा साजरा करणार? असा मोठा प्रश्न त्यांच्यासमोर उभा टाकल्याचे लक्षात घेऊन जलनायक मयंक गांधी यांच्या ग्लोबल विकास ट्रस्टने मदतीचा हात पुढे केला आहे. शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न आहेत, अनेक समस्या आहेत, त्यातच आलेले नैसर्गिक संकट हे मोठे असून अशा खडतर काळात सर्वांनी एकोप्याने राहून एकमेकांना मदतीचा हात दिला पाहिजे असे मत कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.. परळी वैजनाथ तालुक्यातील परचुंडी, सेलू आणि मलनाथपूर, भिलेगाव तसेच अंबाजोगाई तालुक्यातील राक्षसवाडी येथील नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेण्यात आला. याप्रसंगी प्रत्येक गावातील महिला व पुरुष शेतकऱ्यांनी समोर येत त्यांच्या भावना व्यक्त केल्या.

### ८१६ गावे आणि ३ हजार कुटुंबांना मदत!

ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात परळी आणि अंबाजोगाई तालुक्यात जोरदार पाऊस झाला. या पावसाने नद्या - नाले एक होऊन प्रचंड मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अनेक गावांत महापूर आल्याने नदीकाठी असलेल्या शेतजमीनी व त्यावरील पिके, काही शेतकऱ्यांची जनावरे, शेती उपयोगी साहित्य वाहून गेल्याने त्यांना मदतीचा हात मिळणे आवश्यक होते. ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने १६ गावांतील नुकसानग्रस्त जवळपास ३ हजार कुटुंबांना २२ जीवनावश्यक वस्तूंची दीड महिना पुरेल एवढी परिपूर्ण किराणा किट मदत म्हणून देण्यात येत आहे.

# प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड लिखित ट्रस्ट अँड प्रायव्हसी इन ई-कॉमर्स ग्रंथाचे प्रकाशन

प्रतिनिधी । दापोली

डिजिटल युगात ई-कॉमर्स व्यवसायाचे स्वरूप बदलत चालले असून, ग्राहकांचा विश्वास आणि गोपनीयता ही या क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाची बाब ठरली आहे. या पार्श्वभूमीवर, डॉ. भारत डी. कऱ्हाड आणि डॉ. राजेश पी. कुचेकर यांनी सह-लेखन केलेले पुस्तक ई-कॉमर्समधील विश्वास आणि गोपनीयता म्हणजेच ढ्रींीीं रपव झीळींरलू ळप ए-उेााशीलश नुकतेच प्रकाशित केले.

हे पुस्तक आर. व्ही. बेलोसे एज्युकेशन फाउंडेशनच्या माजी सभापती जानकीताई बेलोसे यांच्या हस्ते अधिकृतपणे प्रकाशित करण्यात आले. या प्रसंगी उद्योजक धनंजय यादव आणि मीना कुमार रेडिज हे मान्यवर उपस्थित होते.

पुस्तकात ई-कॉमर्समधील विश्वास आणि गोपनीयतेच्या मुद्द्यांचे सखोल विश्लेषण केले आहे. यात ग्राहकांचा वर्तनावर होणारा परिणाम, व्यवसायासाठी विश्वास निर्माण करण्याच्या सर्वोत्तम पद्धती,




नियामक चौकट, गोपनीयतेचे नियम, तसेच भविष्यातील नव्या तंत्रज्ञानाचा (जसे की ब्लॉकचेन) उपयोग यांचा समावेश आहे. तसेच, वास्तविक उदाहरणे आणि केस स्टडी यांचा समावेश करून व्यवसायिकांना प्रत्यक्ष मार्गदर्शन देण्याचा प्रयत्न केला आहे.

डॉ. कऱ्हाड, हे न.का. वराडकर कला व रा.वि. बेलोसे कॉमर्स कॉलेज, दापोली येथे प्राचार्य आहेत, आणि चार्टर्ड अकाउंटंट, एम.कॉम., एमबीए व पीएच.डी. असे बहुविध शैक्षणिक पार्श्वभूमीचे तज्ज्ञ आहेत. डॉ. कुचेकर हे बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स (इचउउ), पुणे मध्ये मार्केटिंग विभागाचे प्रमुख आहेत आणि २९ वर्षांचा शैक्षणिक अनुभव तसेच विविध संशोधन व सामाजिक उपक्रम यामध्ये सक्रिय आहेत.

लेखकांच्या मते, हे पुस्तक विद्यार्थी, शिक्षणतज्ज्ञ, व्यवसायिक व उद्योजक यांच्यासाठी मार्गदर्शक ठरेल, जेणेकरून ऑनलाइन व्यवसायात विश्वास आणि गोपनीयतेचे महत्त्व समजून त्यावर आधारित धोरणे राबवता येतील. पुस्तकाचे प्रकाशक पंडित पब्लिकेशन्स आहेत.

# व्यावसायिक क्षेत्रात वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात संधी - सीएस.कोमल मुथा

प्रतिनिधी । बीड

वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांना सीए, सीएस, सीएमए या व्यावसायिक कोर्सेस अंतर्गत विविध क्षेत्रांमध्ये चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतात तसेच या परीक्षेसाठी असणारी पात्रता, विषय. परीक्षेचे विविध या संदर्भात विद्यार्थ्यांनी अद्ययावत माहिती घेऊन या क्षेत्रात आपले करिअर करावे असे प्रतिपादन सीए.सीएस. सीएमए माजी सदस्य थखठऊ`ष खउडख कोमल मुथा यांनी केले.

येथील बलभीम कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात वाणिज्य मंडळांतर्गत वाणिज्य क्षेत्रात करिअच्या विविध संधी या विषयावर एकदिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य




**बलभीम महाविद्यालयात वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित कार्यशाळेत प्रतिपादन**

प्रो . डॉ.संतोष उंदरे हे होते तर मंचावर मा. सुमीत साबू, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. संजय रत्नपारखे यांची प्रमुख उपस्थिती होती. सीए.सीएस, सदस्य थखठऊ`ष खउडख मा. सुमित साबू यांनी आपल्या मनोगतामध्ये कार्पोरेट क्षेत्रात,भांडवल बाजारामध्ये कंपनी सेक्रेटरीची भूमिका खूप महत्त्वाची असते असे सांगितले, कंपनी सेक्रेटरी हा प्रोफेशनल कोर्स पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना लिस्टेड कंपनीमध्ये, सार्वजनिक कंपनीमध्ये, मल्टिनॅशनल कंपनीमध्ये मोठ्या पॅकेज अंतर्गत नोकऱ्या मिळतात, तसेच लिस्टेड कंपन्यांमध्ये कंपनी सेक्रेटरी ची नियुक्ती करणे भारतीय कायद्यानुसार सक्तीची आहे असे सांगितले.

प्राचार्य डॉ.संतोष उंदरे आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात म्हणाले की, विद्यार्थ्यांनी रोजगाराभिमुख कौशल्य विकसित करणे गरजेचे आहे , त्यांना वाणिज्य शाखेअंतर्गत सीए. सीएस, सार्वजनिक, खाजगी, सहकारी बँका, कॉर्पोरेट सेक्टर, स्टॉक मार्केट, म्युचल फंड वितरक, भांडवली बाजार, वित्तीय सेक्टर, इत्यादी क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत, त्यामुळे विद्यार्थ्यांनी कौशल्य विकसित करणे तसेच भविष्याचे नियोजन करणे हे महत्त्वाचे आहे असे सांगितले.


या एकदिवसीय कार्यशाळेचे प्रास्ताविक वाणिज्य विभागप्रमुख डॉ.संजय रत्नपारखे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भारत दहे यांनी केले.प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा.अक्षय ढाकणे आणि प्रा.सभा खान यांनी करून दिला तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ . संदीपकुमार उनवणे यांनी केले. कार्यक्रमाला डॉ. वृषाली कुटे , प्रा. शैलेश कुलकर्णी, प्रा. प्रतीक्षा देशमुख व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# बदनापुरला धर्मवीर दिघे नागरी सहाय्यता कक्षाची उपमुख्यमंत्री शिंदेच्या हस्ते ऑनलाईन सुरुवात

प्रतिनिधी । बदनापुर

शिवसेनेच्या दसरा मेळाव्यात 'धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्ष' या अनोख्या अभियानाचे लोकार्पण शिवसेनेचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या हस्ते पार पडले.

राज्यभरात विविध १०० ठिकाणी धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्ष सुरू झाले आहेत.बदनापूर येथील शिवसेना जनसंपर्क कार्यालयात शिवसेना उपनेते आ. अर्जुनराव खोतकर, संपर्क प्रमुख पंडितराव भुतेकर ,युवासेना सचिव आभिमन्यु खोतकर ,जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, ए. जे. बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली ऑनलाइन पद्धतीने उद्घाटन करण्यात




आले .यावेळी शिवसेना शहर प्रमुख आंबादास कोळसकर ,युवासेना तालुका संघटक अमोल दाभाडे ,शिवसेना ओबीसी आघाडीचे तालुका प्रमुख कैलास वैद्य, रमेश चोरमारे आदींची उपस्थिती होती. कक्षांच्या माध्यमातून केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवली जाणार आहे. केवळ माहितीच नाही तर थेट नागरिकांना या योजनांचा लाभ मिळवून देण्याचे कार्य केले जाणार आहे.

**नागरिकांनी लाभ घ्यावा : घुगे**

धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्ष शासन आणि जनता यांच्यात समन्वय सेतू म्हणून काम करणार आहे. केंद्र आणि राज्य शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ नागरीकांना मिळवून दिला असून नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी केले आहे.

# राजर्षी शाहू विद्यामंदिर शाळेचा पालक मेळावा उत्साहात संपन्न

प्रतिनिधी । केज

केज शहरातील स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज संचलित राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत दरवर्षीप्रमाणे पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय ड. राजेसाहेब देशमुख उर्फ पापा यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून केज शहरातील ज्येष्ठ साहित्यिक तथा सेवानिवृत्त शिक्षक श्री.हनुमंत घाडगे यांची उपस्थिती होती.मंचावर संस्थेचे सचिव श्री.जी.बी. गदळे,सामाजिककार्यकर्ते प्रा.हनुमंत भोसले, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती बी.बी.चाटे यांची उपस्थिती होती.सर्वप्रथम आरक्षणाचे जनक राजर्षी




शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर उपस्थित पालकांनी आपल्या पाल्याच्या प्रगती बाबत सूचना व्यक्त केल्या. यामध्ये बहुतांश पालकांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.पालकांमधून दिलीप बनसोडे यांनी प्राथमिक स्वरूपात आपले मत मांडले. पालकांच्या सूचना बाबत संस्थेचे सचिव श्री.जी.बी. गदळे यांनी संस्थेच्या वतीने उत्तर दिले.उपस्थित हनुमंत घाडगे सर यांनी पालकांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत,अभ्यासा बाबत महत्त्वाच्या सूचना केल्या.महापुरुषांचे चरित्र वाचून आदर्श घ्या असे आवाहन त्यांनी यावेळी केले.श्री.हनुमंथ भोसले सर यांनीही उपस्थित पालकांना शाळेतील अभ्यास वेळेवर करणे याबाबतीत सूचना केल्या. अध्यक्षीय भाषणात ड.राजेसाहेब देशमुख यांनी शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी कायमच आग्रही असते,सर्व तळागाळातील मुलांना उत्तम शिक्षण मिळावे यासाठी आपण कार्यरत आहोत असे मत मांडले. एकंदरीत शाळेच्या प्रगती बाबत सर्व उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री.व्ही.बी.यादव यांनी तर प्रास्ताविक श्री.जी.बी. डीरंगे यांनी तर आभार प्रदर्शन श्री.जे.आर.मस्के यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री.ए.डी. देशमुख,श्री.आर.एस. क्षीरसागर,श्रीमती अनिता जाधव यांनी सहकार्य केले.पालक मेळाव्यास सर्व शिक्षक व पालक उपस्थित होते.

# ओबीसी आरक्षण शिवा चे ७ ऑक्टोबरला आझाद मैदान मुंबईत धरणे


प्रतिनिधी । नागपुर

ओबीसी आरक्षणासाठी राष्ट्रीय ओबीसी आरक्षण हक्क परिषद व अखिल भारतीय वीरशैव लिंगायत युवक शिवा संघटना येत्या ( मंगळ. ०७ ऑक्टों.) ला मुंबई आझाद मैदानावर ओबीसींच्या न्याय हक्कासाठी पहील्या आंदोलनाचा शंखनाद करीत आहेत. याबाबत ओबीसी परिषद व शिवा संघटनेची ( ०१ सप्टें.) ला राज्य स्तरीय व्हिडिओ कॉन्फरन्स बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत विविध जिल्ह्यातील पदाधिकारी सहभागी झाले होते. ओबीसींच्या न्याय हक्कासाठी मुंबई उच्च न्यायालयात त्या दिशाभूल करणा-या शासन निर्णयाविरोधात पहिली याचिका दाखल करणारी संघटना म्हणजे शिवा संघटना ही ठरली. आणि ओबीसींच्या आरक्षण रक्षणासाठी येत्या ७ ऑक्टोंबरला मुंबई आझाद मैदानावर पहिले आंदोलन छेडणारी संघटना सुद्धा शिवा संघटना आहे. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन जो मराठा व ओबीसी समाजाची दिशाभूल फसवणूक करून जो ०२ सप्टेंबरला थोतांड जीआर काढला आहे तो रद्द करावा. नवी मुंबई विमानतळाला ओबीसी भूषण के.डी.वाय. पाटील यांचे नाव द्यावे. हैदराबाद सातारा व इतर गॅजेटीयर प्रमाणे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देत आहात तर दुजा भाव न करता लिंगायत वीरशैव समाजासह गॅजेटीयर मध्ये उल्लेख आलेल्या सर्व जातींना ओबीसी व त्या त्या प्रवर्गात आरक्षणाचा लाभ देण्यात यावा. या मागण्यांसाठी येत्या ०७ ऑक्टोंबरला मुंबई आझाद मैदानावर एकदिवसीय धरणे आंदोलनाला जास्तीत जास्त ओबीसींनी आपल्या न्याय हक्कासाठी आपण एकत्र येऊन मुंबई गाठावी असे आवाहन राष्ट्रीय ओबीसी आरक्षण हक्क परिषद व शिवा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे, उपाध्यक्ष माजी आमदार शिवशरण अण्णा बिराजदार, सरचिटणीस उमाकांतआप्पा शेटे, रूपेश होनराव, धन्यकुमार शिवणकर, उपाध्यक्ष अभय कल्लावार, दत्तात्पा खंकरे, वाय. बी. सोनटक्के, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष मनिष पंधाडे, उपाध्यक्ष भिमाप्पा खांदे, सुनिल वाडकर, शैलेश जक्कापुरे यांनी केले आहे. तसेच महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील समस्त ओबीसी समाज बांधव, वीरशैव लिंगायत, वीरशैव नाथजोगी, जैन वाणी, लिंगायत जंगम, वाणी व सर्व ओबीसी समाजबांधवांनी जास्तीत जास्त संख्येने ०७ ऑक्टोंबरला मुंबईत येत या अभूतपूर्व व पहिल्या शंखनाद आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन राष्ट्रीय ओबीसी आरक्षण हक्क परिषद व अखिल भारतीय वीरशैव लिंगायत युवक शिवा संघटना महाराष्ट्र यांनी केले आहे.

# सर्व जाती धर्माच्या लोकांनी परस्पराशी भेदभाव न करता एकत्र रहावे - ज्ञानदेव महाराज जळकीकर

प्रतिनिधी । आष्टी

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताह सोहळा सुरू आहे. या निमित्ताने हरिभक्त परिवाराचे ह. भ. प. ज्ञानदेव महाराज जळकीकर यांचे कीर्तन झाले. कीर्तनातून त्यांनी समाजात एकतेचा संदेश दिला. महाराजांनी सांगितले की, सर्व जाती - धर्माच्या लोकांनी परस्परांशी भेदभाव न करता एकत्रित रहावे. समाजात प्रेमभावाचे वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. यासाठी गुण्या गोविंदाने रहाणे अत्यावश्यक आहे.




भगवद्रामाचे सतत स्मरण करणाऱ्या माणसाचे मन शुद्ध होते आणि तो सर्वांबद्दल प्रेमभाव बाळगू शकतो, असे ते म्हणाले. पुढे महाराज म्हणाले आम्ही एक मिनिटामध्ये कीर्तनात भांडण लावून जाऊ शकतो, परंतु तुम्हाला गावात राहायचे असते. जगात वारकरी संप्रदाय ज्ञानदानाचे काम करतो. जिथे पाय डुलते ती गायक नसते, जिथे मान डूलते ते गायनाचार्य असते. गृहस्थ का काम भिक्षा देना संन्यासी का काम दीक्षा देना. यावेळी सांगवी पाटण व पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात गावागावातून आलेल्या भाविकांनी उत्साहात सहभाग घेतला.

# मराठवाड्यातील शेतकरी उध्वस्त, सरकारने ओला दुष्काळ जाहीर करावा - सी.बी.एस. इनामदार

केज/प्रतिनिधी

मराठवाड्यात यावर्षी जून २०२५ ते सप्टेंबर २०२५ दरम्यान सरासरीपेक्षा २५० मिमी अधिक पाऊस झाल्याने सर्वच तालुक्यांतील शेतकरी अडचणीत आले आहेत. यामुळे संपूर्ण मराठवाड्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची आणि उच्च न्यायालयाने २०२० मध्ये दिलेल्या आदेशाची त्वरित अंमल बजावणी करण्याची मागणी माऊली बळीराजा सामाजिक प्रतिष्ठान नाहोली,ता.केज जि.बीड या संस्थेने केली आहे. नुकसानी संदर्भातील ऐतिहासिक पार्श्वभूमी अशी आहे की दिनांक २९ ऑगस्ट २०१९ रोजी शासन निर्णय क्र.१६५/३ अन्वये शेतकऱ्यांना अति वृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या भरपाई साठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधी व राष्ट्रीय आपत्ती निधी मधून मदत देण्याचे ठरविण्यात आले होते.त्यापूर्वी दिनांक १३ मे २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार नुकसान भरपाईचे दर तीन पट वाढविण्यात आले होते.



### शेतकऱ्यांची तळमळ सरकार ऐकत नाही - इनामदार

पत्रकार असो,विरोधी पक्ष असो किंवा सामान्य जनतेची भूमिका असो पण किमान मा. न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी सरकारने करावी, असे ठाम मत इनामदार यांनी व्यक्त केले.त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडेही थेट मागणी केली आहे की,त्यांनी स्वतःच घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करावी.

### सद्यस्थिती आणि नवीन मागण्या:

सन २०२५-२६ मध्ये अतिवृष्टीमुळे पुन्हा मराठवाड्यात अतोनात नुकसान झाले असून, शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सध्या मराठवाडा ओला दुष्काळाच्या स्थितीत असून,सरकारने तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करावा,तसेच मा.उच्च न्यायालयाने २०२० मध्ये दिलेल्या आदेशांची संपूर्ण अंमलबजावणी करावी, अशी मागणी इनामदार यांनी केली आहे.

मात्र,शासनाने या निर्णयांची अंमलबजावणी न केल्यामुळे माऊली बळीराजा सामाजिक प्रतिष्ठानने जनहित याचिका १३२/२०१९ दाखल केली होती.त्यावर २३ सप्टेंबर २०२० रोजी माननीय उच्च न्यायालय खंडपीठ,औरंगाबाद यांनी शासनाला निर्णयानुसार नुकसान भरपाई वितरित करण्याचे आदेश दिले.

शासनाकडून फक्त ६०४ कोटींचे वाटप, उर्वरित निधी रखडला

या आदेशानंतर शासनाने फक्त ६०४ कोटी रुपयांचे नुकसान भरपाई वाटप केले.मात्र,उर्वरित निधी वितरित न झाल्याने अनेक शेतकरी अद्याप भरपाई पासून वंचित आहेत.या पार्श्वभूमीवर संस्थेचे अध्यक्ष सी.बी. एस. इनामदार यांनी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही निवेदन दिले होते. त्यानंतर १७ नोव्हेंबर २०२२ रोजी शासनाने २०२१-२२ या वर्षासाठी नवीन आदेश काढून वाढीव दर निश्चित केले, मात्र त्यामध्येही वर्गवारी नुसार निधी वितरण न झाल्याचा आरोप आहे.

### राजकीय पाठिंबा देखील

या मागणीला राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्या किसान सेलचे बीड जिल्हाध्यक्ष यांनीही पाठिंबा दिला असून, लवकरात लवकर शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी जन आंदोलन उभारण्याचा इशारा दिला आहे.

# पाडळी उच्च माध्यमिक विद्यालयाचे सहशिक्षक रामराव देशपांडे यांचा सेवापूर्ती कार्यक्रम संपन्न

शिरूर कासार /प्रतिनिधी

आदर्श शिक्षण संस्था बीड संचलित पाडळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळी तालुका शिरूर कासार येथील सहशिक्षक रामराव देशपांडे यांचा सेवापूर्ती कार्यक्रम ३० रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला सर्वप्रथम विद्येची देवता सरस्वती व स्वर्गीय काकू व नानांच्या प्रतिमेचे पूजन अध्यक्ष व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर सत्कारमूर्ती रामराव देशपांडे व सुनितताताई देशपांडे यांचा सत्कार सर्व पोशाख विठ्ठल रुक्मिणी मूर्ती पुष्पहार व श्रीफळ देऊन प्राचार्य अंगदराव दहिफळे, मान्यवर व कर्मचारी वृंदांनी केला या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य अंगदराव दहिफळे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच गाहिनाथ पाखरे उपसरपंच किसन इंगळे माजी सरपंच रामदास हंगे चेअरमन भगवान पाखरे माजी प्राचार्य सुधाकर खोले गोरख सानप नरेश कंटाळे ऋषी राऊत दत्तात्रय इंगळे प्रकाश इंगळे गोपाळ कुलकर्णी अशोक इंगळे आदींची उपस्थित होती या कार्यक्रमांमध्ये देशपांडे सरांच्या कार्यावर सरपंच गहीनाथ पाखरे माजी सरपंच रामदास हंगे चेअरमन भगवान पाखरे आदींनी मनोगत व्यक्त करून त्यांच्या कार्याचा गौरव केला कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य दहिफळे बोलताना म्हणाले की तत्त्वनिष्ठ प्रामाणिकपणा बौद्धिक व शारीरिक मेहनतीने देशपांडे सरांनी अध्यापनाचे कार्य



३२ वर्षे अविरतपणे केले त्यांची कार्याची उमेद आदर्श घेण्यासारखे आहे इथून पुढे देशपांडे सरांनी देव दान धर्म राष्ट्र सेवा संत सेवा आई वडिलांची सेवा करून आनंदी जीवनाची वाटचाल करावी असे त्यांनी बोलताना सांगितले या कार्यक्रमास गोपाळ कुलकर्णी महेश कुलकर्णी चंद्रकांत देशपांडे खंडू कुलकर्णी राजाभाऊ जोशी नवनाथ चाळक अमोल चाळक दत्तात्रय पावशे देशपांडे परिवाराचे नातेवाईक ग्रामस्थ सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा रजनीताई इंगोले यांनी केले तर आभार महेश उगलमुगले यांनी मानले देशपांडे सरांनी सेवापुर्ती निमित्त सर्वांना गोड भोजनाचा आनंद दिला वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# मराठवाडा मित्र मंडळाचे अध्यक्ष भाऊसाहेब जाधव मराठवाडा पुण्यभूषण पुरस्काराने सन्मानित

## मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शिवकुमार डिगे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन केला गौरव

पुणे / अनंत जाधव

मराठवाडा पुण्य भूषण सोहळा समिती पूणे आयोजित २०२५ पुण्यभूषण पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन दिनांक ०४ ाक्टोबर शनिवार रोजी सांयकाळी ६ वाजता काळे हॉल, गोखले इन्स्टिटयूट येथे करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.गो.बं देगलूरकर होते तर या कार्यक्रमाचे आयोजन ड दादासाहेब भोईटे,विठ्ठल कदम, ड अविनाश कामखेडकर यांनी केले.पुरस्कार सोहळ्याचे वितरण मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मा. शिवकुमार डिगे साहेब यांच्या हस्ते मराठवाडा मित्र मंडळाचे अध्यक्ष भाऊसाहेब जाधव यांच्यासह अन्य पुरस्कारर्थी

प्रमोद गिरिगोस्वामी अध्यक्ष, जिल्हा तक्रार निवारण आयोग, सातारा-सांगली,ऋषिकेश सारूक प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अकोला ,ड.धैर्यशील गाढवे साहाय्यक सरकारी अभियोक्ता, ड. मोनाली काळे शिंदे साहाय्यक सरकारी अभियोक्ता, ड. गणेश कवडे माजी अध्यक्ष फॅमिली कोर्ट बार असोसिएशन ,ड. विश्वजित पाटील माजी उपाध्यक्ष पुणे बार असोसिएशन, ड. पवन कुलकर्णी माजी उपाध्यक्ष, पुणे बार असोसिएशन,ड. भाग्यश्री गुजर-मुळे सचिव पुणे बार असोसिएशन या सर्व सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी यांना विविध मान्यवरांच्या हस्ते २०२५ चा मराठवाडा पुण्यभूषण पुरस्काराचे सन्मान चिन्ह आणि गौरव पत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक राम माने यांनी केले.पुरस्कारर्थी भाऊसाहेब जाधव सर बोलताना म्हणाले माझ्या पुरस्कार मध्ये माझा एकट्याचा वाटा नसून माझ्या पत्नीचा बहुमूल्य वाटा आहे पुढे बोलताना आपल्या गावाकडचे काही किस्सेही त्यांनी सांगितले. जेव्हा मी पुण्यात आलो तेव्हा मला अनेक अडचणीना सामोरे जावा लागले. माझ्या शौषणिक जीवनातील विविध अनुभव त्यांनी प्रेक्षकांसमोर मांडले आणि हा मिळालेला पुरस्कार हा माझा नसुन हा तुम्हा सर्वांचा पुरस्कार आहे असे बोलून कृतज्ञता व्यक्त केली. न्यायमूर्ती मा. शिवकुमार डीगे सर आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले, सम्राट नेपोलियनच्या कारकीर्दी मध्ये अशक्य हा शब्द कधीच वापरला नाही.त्याच प्रमाणे मराठवाडा मित्र मंडळाचे अध्यक्ष भाऊसाहेब जाधव सर यांनी ही मराठवाड्यातील गरीब व गरजूवंत होतकरू विद्यार्थ्यांना मदत करताना व विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवताना नाही शब्द हा कधीच वापरला नाही .यामुळे मराठवाड्यातील विद्यार्थ्यांच्या




शैक्षणिक तसेच राहण्याच्या जेवणाच्या व इतर समस्याही सुटत गेल्यामुळे मराठवाड्यातील हजारो विद्यार्थी पुण्यामध्ये शिक्षण घेऊ शकले व ते सर्वजण वेगवेगळ्या पदावर आहेत. सरांनी आधार वडा प्रमाणे मराठवाड्यातल्या विद्यार्थ्यांना पुण्यामध्ये मायेची सावली दिली. जे विद्यार्थी जाधव सरांच्या संपर्कात आले नसते तर ते विद्यार्थी आज आपल्याला तज्ञ दिसले नसते, सेलू सारख्या छोट्या गावातून सुरू केलेला प्रवास इथ पर्यंत सोपं नव्हता . ज्या ठिकाणी सरकार मदतीसाठी पोहोचू शकत नाही ते मराठवाडा सारख्या सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था करतात. एखाद्या सुपरहीट चित्रपटात आमीताफ बच्चन सारखे हिरो हे चित्रपटसृष्टीतील पडद्यावरचे नायक असले तरी जाधव सर हे सामाजिक क्षेत्रातील मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी खरे नायक आहेत. जाधव सरांनी पुण्यात शिक्षण घेण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पैसे नसलेल्या गावी परतणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना मदत करून आधार दिला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. जाधव सरांना आणि अन्य सत्कार मुर्ती यांना न्यायमूर्ती डीगे यांनी शुभेच्छा दिल्या.ड अविनाश कामखेडकर आपले मत व्यक्त करताना आपल्या महाविद्यालयीन जीवनातील काही जुन्या आठवणींना उजाळा देत सांगितले की मराठवाडा महाविद्यालयात शिक्षण घेत असताना घडल्याले काहीं जुने किस्से सांगून यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. डॉ. गो.बं देगलूरकर या कार्यक्रमाचा अध्यक्ष समारोप करताना म्हणाले सातवाहन काळापासून ते यादवांच्या काळापर्यंत जितके राज्यकर्ते झाले, त्या सर्वांच्या राजधान्या मराठवाड्यात होत्या. 'यथा राजा, तथा प्रजा' या उक्तीप्रमाणे त्यांनी निर्माण केलेली संस्कृती संपूर्ण महाराष्ट्राभर पसरली. एकेकाळी असा वैभव असणाऱ्या मराठवाड्यात आता पुन्हा इतिहासाची पुनरावृत्ती होत आहे. भाऊसाहेब जाधव आणि त्यांच्या कार्याकडे पाहिले की त्याची प्रचिती येते. गोदावरीचे पाणी प्यायलेला मनुष्य मागे राहणार नाही.मराठवाड्याने अनेक संतांचे कार्य पाहिले. 'एक एका साह्य करूं, अवघें धरूं सुपंथ' असे कार्य करणारी माणसे इथे उभी राहिली. मराठवाड्यातील माणसे भांडत नाहीत, हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. विदर्भाने भांडून आपला हक्क मिळवला. मात्र, मराठवाड्याकडे नेहमीच दुर्लक्षच होत गेले.या देशाला मराठवाड्याने अनेक कर्तृत्ववान माणसे दिली. त्यात गुजरात राज्याच्या किनारपट्टीवरील लोथल आणि बेट द्वारका यांच्यासारख्या महत्वाच्या पुरातत्व स्थळांचा शोध लावणारे एस. आर. राव यांच्यासारख्या व्यक्तींचा समावेश होतो. अशी अनेक रत्ने मराठवाड्याने दिली आहेत. त्यामुळे मराठवाड्याला मागास समजण्याचे कोणतेही कारण नाही. आता आपण मागासलेले नाहीत असे मत व्यक्त केले.यावेळी उपस्थित लातूरचे डीजीपी संतोष देशपांडे , पिंपरी चिंचवडचे सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांच्यासह मराठवाडा मित्र मंडळाचे पदाधिकारी, कर्मचारी , विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाची सांगता स्वागत गीताने करण्यात आली.

# पूरग्रस्तांच्या मदतीसाठी पत्रकारांबरोबर इतरांनी पुढे यावे - आण्णा बनसोडे






भोसरीतील महारक्तदान शिबिराला पत्रकार व नागरिकांचा मोठा प्रतिसाद

पिंपरी, पुणे (प्रतिनिधी)

मराठवाड्यातील पूरग्रस्त बांधवांच्या पाठीशी महाराष्ट्र शासन खंबीरपणे उभे आहे. स्वतः होऊन स्वयंस्फूर्तीने पत्रकार बंधू, भगिनी देखील आता मराठवाडा मिशन उपक्रमातून मदतीस आले आहेत. आपण समाजाचे देणं लागतो या कृतज्ञ भावनेतून त्यांनी आयोजित केलेले रक्तदान शिबिर हा स्तुत्य उपक्रम आहे. यास माझ्या शुभेच्छा. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई वराजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ लांडेवाडी, आणि नवमहाराष्ट्र मित्र मंडळ या सारख्या समाजातील इतर संस्था, संघटना, मंडळ, ट्रस्ट, उद्योजक व दानशूर व्यक्तींनीही पुढे यावे असे आवाहन विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी केले.

मराठवाड्यात मागील दोन महिन्यात झालेल्या पाऊसामुळे तेथील शेतकरी बांधवांचे अतोनात नुकसान झाले आहे, हजारो दुभती जनावरे मृत्युमुखी पडली असून तेथील शेतकरी उध्वस्त झाला आहे. पूरग्रस्त भागात रोगराई पसरली तर रक्ताचा तुटवडा भासू शकतो यासाठी मराठवाडा मिशन अंतर्गत पहिला टप्पा म्हणून भोसरी येथे रक्तदान शिबिर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ लांडेवाडी, आणि नवमहाराष्ट्र मित्र मंडळ, भोसरी या संस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे व भोसरी विधासभेचे प्रथम आमदार विलास लांडे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक विश्वनाथ लांडे, विक्रांत लांडे पाटील, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई चे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे,अतुल परदेशी प्रदेश अध्यक्ष इलेक्ट्रॉनिक मीडिया महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, राज्य समन्वयक नितीन शिंदे, पुणे जिल्हा अध्यक्ष बापू जगदाळे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सचिन चपळगावकर, पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष अतुल क्षीरसागर, प्रसिद्ध चित्रकार संजय खिलारे, अभिनेत्री आर्या घारे, उद्योजक विकास साने, ब्राम्हण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष डॉ.सचिन बोधणी, ड. गणेश शिंदे, संभाजी बिग्रेडचे प्रदेश उपाध्यक्ष अभिमन्यू पवार, टी वी ९ मराठीचे प्रतिनिधी रणजीत जाधव, साम मराठी चे प्रतिनिधी गोपाळ मोटघरे, आपला आवाज नेटवर्क चे मुख्य संपादक अतुल परदेशी, एनडीटीव्ही मराठीचे प्रतिनिधी सुरज कसबे आदी उपस्थित होते.

या शिबिरास नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. ४०० पेक्षा अधिक रक्तदात्यांनी या शिबिरात आपला सहभाग नोंदविला माजी आमदार विलास लांडे पाटील यांनी शुभेच्छा देताना सांगितले की, किल्लारी भूकंपा नंतर अनेक वर्षानंतर मराठवाड्यावर ओढवलेले हे मोठे संकट आहे. पण या संकटात पूरग्रस्त बांधवानी एकटे समजू नये, तर पिंपरी चिंचवड मधील नागरिक कायम त्यांच्या सोबत आहेत, पत्रकारांनी सामाजिक जाणिवेतून घेतलेला हा उपक्रम पूरग्रस्त भागातील बांधवांना दिलासा देणारा ठरेल असा विश्वास वाटतो. प्रास्ताविक करताना गोविंद वाकडे यांनी सांगितले की, रक्तदान हे जीवदान आहे. आपण दिलेल्या रक्तामुळे एखाद्या व्यक्तीचा जीव वाचवू शकतो ही समर्पणाची भावना ठेऊन आयोजन केले आहे. रक्ताच्या शेवटच्या थेंबा पर्यंत आम्ही मराठवाड्यातील शेतकरी बांधवांसोबत आहोत असे गोविंद वाकडे यांनी सांगितले. सचिन चपळगावकर यांनी सांगितले की, हे संकलन केलेले रक्त गरजू रुग्णांना सोमवार पासून बार्शी येथील भगवंत ब्लड बँक आणि उमरगा, धाराशिव येथील श्री श्री रविशंकर ब्लड बँक स्टोरेज येथे उपलब्ध होईल.

# देगलूर येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा

देगलूर (प्रतिनिधी) शहरातील नागार्जुन बुद्ध विहार, सिध्दार्थनगर येथे ६९ व्या धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनानिमित्त सकाळी ८.३० वाजता बुद्ध विहार समितीचे उपाध्यक्ष मिलिंद बिरकंगन यांच्या हस्ते पंचरंगी धम्म ध्वजारोहण तर उद्योजक मालू कांबळे यांचे हस्ते निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात येऊन सामूहिक त्रिशरण पंचशील घेऊन वंदन करण्यात आले. तर दुपारी २ वाजत प्रज्ञासुर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैल चित्राची शहरातील मुख्य रस्त्याने भव्य मिरवणूक काढण्यात आली.

भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे दि.१४ ऑक्टोबर १९५६ अशोक विजयादशमी रोजी बौद्ध धम्माची दिक्षा घेतली. या ऐतिहासिक दिवसापासून आंबेडकरी बौद्ध अनुयायी धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन उत्सव म्हणून साजरा करतात त्यानुसार ६९ व्या धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन उत्सव समितीच्या वतीने रात्री फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. सकाळी सिध्दार्थनगर, येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्धांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून सामूहिक त्रिशरण पंचशील घेऊन



अभिवादन करण्यात आले. दुपारी नागार्जुन बुद्ध विहार, सिध्दार्थनगर येथून प्रज्ञासुर्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैल चित्राची भव्य मिरवणूक शहरातील मुख्य रस्त्याने काढून ट महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास उत्सव समितीचे अध्यक्ष सचिन कांबळे, धिरज वाघमारे, अतिष वाघमारे, सुमेधबोधी बिरकंगन,अजय सुर्यवंशी, लालू सोनकांबळे,वाय.जी.सोनकांबळे,यादव फिंरगे,सतिश पांडवे,अशोक कांबळे,गौतम कांबळे, सचिन पवाडे, दिलीप बसवे,पें.संजय कांबळे, भीमराव भाटापूरकर,बालाजी भुतनरे, आकाश वाघमारे यांनी पुष्पहार अर्पण करण्यात आले. भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा देगलुर,समता सैनिक दलासह देगलूर शहर व तालुक्यातील बौद्ध बांधव उपासिकांनी धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्सव मिरवणूकीत पांढरे शुभ्र वस्त्रे परिधान करून मोठ्या संख्येने उत्सव साजरा करण्यासाठी सहभागी झाले होते.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG



# जि.प आरोग्य विभागाच्या वतीने पूरग्रस्त भागात आरोग्य शिबिरांचे आयोजन जनतेच्या आरोग्य सुरक्षेला प्राधान्य

नांदेड, : नांदेड जिल्ह्यातील पूरग्रस्त भागात पूरस्थितीनंतर उद्भवणाऱ्या आरोग्य समस्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी तसेच साथीचे आजार टाळण्यासाठी नांदेड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या वतीने आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या संकल्पनेतून व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही शिबिरे घेण्यात येत आहेत.

या आरोग्य शिबिरांना दि. ३ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली असून ती ६ ऑक्टोबरपर्यंत पूरग्रस्त भागांमध्ये राबविण्यात येणार आहेत, अशी माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या ३७७ गावांमध्ये पहिल्या टप्प्यात ही शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत.३ ऑक्टोबर रोजी ४५ गावांमध्ये, तर ४ ऑक्टोबर रोजी १५ गावांमध्ये ही शिबिरे घेण्यात आली. ६ ऑक्टोबर रोजी आणखी ७ गावांमध्ये आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. ३ ऑक्टोबर रोजी झालेल्या शिबिरांमध्ये ३ हजार ९०० ग्रामस्थांची वैद्यकीय तपासणी करून आवश्यक उपचार देण्यात आले. ज्येष्ठ नागरिक, महिला व लहान मुलांची विशेष तपासणी करण्यात आली.रक्तदाब, मधुमेह, त्वचारोग, तसेच कीटकजन्य व जलजन्य आजार, पोटदुखी,



ताप, उलटी, अतिसार, डेंग्यू, मलेरिया आणि चिकनगुनिया यांची तपासणी करून उपचार व जनजागृती करण्यात आली.आरोग्य विभागाचे डॉक्टर, अधिकारी आणि आरोग्य कर्मचारी यांनी ग्रामस्थांना परिसर स्वच्छ ठेवणे, पाण्याचे साठे कोरडे करणे, नाल्या वाहत्या ठेवणे आणि शुद्धीकरण केलेले पाणी वापरणे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.दरम्यान, अर्धापूर येथे आयुष्यमान आरोग्य शिबिराला आमदार श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी भेट देऊन पूरग्रस्त जनतेशी संवाद साधला. त्यांनी सर्व आवश्यक आरोग्य सेवा पुरविण्यास तसेच स्वच्छतेला प्राधान्य देण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला दिल्या. ही शिबिरे यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, डॉ. श्रीकांत देसाई, तसेच सर्व तालुका आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय

# शेतकऱ्यांचे संकट दूर करा; ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट कर्जमाफीची जिजाऊ ब्रिगेडची मागणी

देगलूर /प्रतिनिधी

देगलूर : तालुक्यातील जिजाऊ ब्रिगेडतर्फे तहसीलदार भारत सूर्यवंशी यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात शेतकऱ्यांवर कुठल्याही प्रकारचा अन्याय न होता पंचनामा न करता सरसकट ओला दुष्काळ जाहीर करून सर्व कर्जमाफी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

गेल्या दीड-दोन महिन्यांपासून झालेल्या अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे शेतकऱ्यांची बिकट अवस्था झाली आहे. या गंभीर परिस्थितीत शेतकरी संकटात सापडला असून, बी-बियाणे स्वखर्चाने करूनही मुसळधार पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे प्रशासनाने खोटे आश्वासन न देता सरसकट मदत व कर्जमाफी करावी, असे जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने निवेदनात स्पष्ट




करण्यात आले आहे.

काही नेतेमंडळी केवळ अतिवृष्टीचे पाहणी करून फोटोसेशन करत असल्याचा उल्लेखही निवेदनात करण्यात आला. शेतकऱ्यांचे खरे प्रश्न सोडवण्यासाठी तात्काळ निर्णय घेऊन पंचनामे न करता ओला दुष्काळ जाहीर करावा, सरसकट कर्जमाफी करून शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत मिळावी, अशी मागणी जिजाऊ ब्रिगेडने केली आहे.या वेळी जिजाऊ ब्रिगेडच्या तालुकाध्यक्षा चैतन्याताई वानखेडे, सचिव रंजनाताई मानुरे, कार्याध्यक्ष दिपालीताई वानखेडे, संगीताताई कदम, मार्गदर्शक सुजाताताई वानखेडे यांच्यासह सर्व महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

# नांदेड जिल्ह्यात शिवसेना-भाजप राष्ट्रवादी महायुतीत आघाडी का बिघाडी ?

**अनिल धमने (पाटील)**
**नांदेड जिल्हा प्रतिनिधी**

नांदेड :- महाराष्ट्र राज्यात महायुती सरकार आहे यामध्ये भाजप शिवसेना शिंदे गट राष्ट्रवादी अजितदादा गट या तिघांचे मिळून सरकार आहे मात्र येत्या निवडणुकीमध्ये नांदेड जिल्ह्यात व राज्यात ज्याप्रकारे सरकार चालू आहे त्या प्रकारे नांदेड जिल्ह्यात महायुतीतील नेत्यांचे एकमेकां मध्ये अलबेल नसल्याचे दिसून येत आहे कारण येत्या निवडणुकीत नांदेड महानगरपालिका जिल्हा परिषद पंचायत समिती यासह ग्रामपंचायत निवडणूक तोंडावर आली असून नांदेड जिल्ह्यात सध्याला भाजपाचे नेतृत्व करणारे महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा भाजपाचे राज्यसभेचे खासदार अशोकराव चव्हाण यांच्यावर नांदेड जिल्ह्या सह मराठवाड्याची मोठी जबाबदारी असल्याचे दिसून येते पण अशोक रावांना महायुतीतील घटक पक्षांमध्ये म्हणावे तसे एकमत असल्याचे दिसून येत नाही कारण नांदेड जिल्ह्यामध्ये पूर्वी अनेक दशके काँग्रेसमध्ये असलेले अशोकराव चव्हाण हे भाजपा मध्ये आल्यामुळे भाजपाचे जुने व निष्ठावंत पदाधिकारी काही ठिकाणी नाराज असल्याची दिसून येत आहे या निवडणुकीत अशोकराव यांनी जुन्या व नव्या पदाधिकारी यांना सोबत घेऊन काम करून अनेक वर्षा पासून एकनिष्ठ पणे काम करणारे कार्यकर्ते पद अधिकारी यांना न्याय देतील का ? आंधारात सोडतील हेच पाहावा लागेल कारण शिवसेना शिंदे गटाचे विधान परिषदेचे आमदार हेमंत पाटील व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा गटाचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर हे दोघेही सध्या तरी अशोकराव चव्हाण यांच्या विरोधात असल्याची दिसून येत आहे त्यामुळे येत्या काळात शिवसेना . राष्ट्रवादी कॉंग्रेस . भाजप .महायुती होणार का महायुतीत आघाडी वरूण बिघाडी होणार या चर्चांना नांदेड शहरासह जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात चर्चांना उधाण आल्याचे दिसून येते कारण या जर महायुतीच्या बिघाडी मुळे याचा फायदा

कुठे महाआघाडीला होईल का हेच पहावेसे वाटेल कारण यांच्या महायुतीत बिघाडी झाल्यास यांचा फायदा कॉंग्रेस राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट शिवसेना उद्धव ठाकरे गट यांना फायदा होण्याचे मोठ्या प्रमाणातदिसून येत असून या निवडणुकीमध्ये राज्याचे नेतृत्व केलेल्या अशोकराव चव्हाण यांची परीक्षा असल्याचे दिसून येते कारण भाजपाचे मतदार अशोक रावांना स्वीकारतील का नांदेड जिल्ह्यात कोणता पक्ष एक नंबर आहे तो येत्या निवडणुकीच्या नंतरच कळेल कारण सर्वच नेते माझाच पक्ष एक नंबर असल्याचे बोललो जात असून जनता जनार्दन ठरवेल की कोणता पक्ष एक नंबर आहे ते येत्या निवडणुकीमध्ये सर्व राजकीय पक्षांना जनता जनार्दनांनी आपल्या मतपेटीच्या माध्यमातून दाखवून देतील

# ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील एकुण १३० सार्वजनिक दुर्गा मुर्ती मंडळाचे ढोलताशांच्या गजरात विसर्जन

सिडकोतील मुख्य मिरवणूक मध्ये जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांची भेट..

नवीन नांदेड - ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या ग्रामीण भागातील पंधरा गावात एक गाव एक दुर्गा सार्वजनिक नवरात्र दुर्गा मंडळाचे १५ तर एकुण शहरी व ग्रामीण भागात १३० सार्वजनिक नवरात्र दुर्गा मंडळाच्या वतीने ढोल ताशांच्या गजरात झरी येथील खदानीत ढोलताशांच्या गजरात व फटाक्यांच्या आतिषबाजी मध्ये विना डिजे विसर्जन मिरवणूकीत महिलांचा मोठ्या संख्येने सहभाग होता रात्री उशिरापर्यंत दुर्गा देवी मुर्ती विसर्जन केले यावेळी मुख्य मार्गावर अनेक ठिकाणी विविध प्रतिष्ठानचा वतीने अन्नदान, पाणपोई व्यवस्था केली होती, ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरी व ग्रामीण भागात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता, रात्री उशिरा जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी विसर्जन मिरवणूक संदर्भात पोलीस बंदोबस्त आढावा घेतला व नवरात्र महोत्सव मंडळ पदाधिकारी यांच्याशी चर्चा केली.

दसरा निमित्ताने २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर पर्यंत सार्वजनिक नवरात्र दुर्गा मंडळ यांनी विविध धार्मिक कार्यक्रमासह ,शालेय स्पर्धा,यासह महिलांसाठी विविध धार्मिक



कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते तर अनेक सार्वजनिक नवरात्रौत्सव दुर्गा मंडळ यांनी विशेष गरबा आयोजित केली होती, ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व गावातील ग्रामपंचायत पदाधिकारी व विविध राजकीय पक्षांच्ये पदाधिकारी व युवक महिला , पोलीस पाटील,भाविक भक्तांनी एकत्र येऊन ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत पंधरा गावात एक गाव एक दुर्गा सार्वजनिक नवरात्र महोत्सव मंडळ १५ स्थापना केली होती यात खुपसरवाडी, बोढांर,फतेपुर लालंवाडी, पुणेगाव ,मार्कंड, पिंपळगाव निमजी, पिंपळगाव मिश्री,भायेगाव, कल्हाळ, राहेगाव, सिध्दनाथ,इजेगाव ,नागापूर, धनगरवाडी,वाहेगाव या गावांचा समावेश होता तर शहरी भागात ३० परवानगी तर विनापरवाना ४०, ग्रामीण भागात १६ परवानगी,व विनापरवानगी ४४ असा एकुण १३० सार्वजनिक नवरात्रौत्सव दुर्गा मंडळ स्थापन केली होत दि ४ ऑक्टोबर रोजी दुर्गा मुर्ती विसर्जन मिरवणूक सायंकाळी उशिरा शहरी भागातील हडको सिडको मुख्य मार्गावर काढण्यात आली ,यावेळी परिसरातील विविध प्रतिष्ठानचा व सामाजिक राजकीय पदाधिकारी यांच्या वतीने अन्नदान पाणपोई वाटप करण्यात आले. शहरी भागातील सिडको हडको,वाघाळा, असदवन,भागातील अनेक परवाना व विनापरवाना मंडळ यांनी सहभाग नोंदविला यात मोठ्या प्रमाणात महिलासह युवक युवती यांच्या मोठ्या प्रमाणात सहभाग होता. यावेळी शिवसेना नांदेड दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे,भाजपा महानगर उपाध्यक्ष संजय पाटील घोगरे, उदय देशमुख . ,डॉ.करूणा जमदाडे, सौ.ललीता शिंदे,शिवसेना शहरप्रमुख जितुसिंग टाक,सुहास पाटील खराणे,सतिश बस्वदे , ,यांच्या सह विविध राजकीय पक्षांच्ये पदाधिकारी ,सामाजिक कार्यकर्ते,पत्रकार यांच्या सहभाग होता तर असर्जन,वसरणी, जुना कौठा,नवीन कौठा येथे तर ग्रामीण भागातील विष्णुपुरी, धनेगाव,कांकाडी,वाजेगाव,तुप्पा,बळीरामपुर . गोपाळचावडी सह अनेक गावांत रात्री उशिरापर्यंत दुर्गादेवी मुर्ती सार्वजनिक नवरात्रोत्सव

मंडळ यांच्या विसर्जन मिरवणूक निमित्ताने ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली दोन पोलीस निरीक्षक सह १७ साहयक व उपनिरीक्षक, १०१,पोलीस अंमलदार, २१महिला पोलिस अंमलदार,जवळपास ६० पुरूष व महिला होमगार्ड १ एस,आर,पी,तुकडी बंदोबस्ता साठी नियुक्त केले होते.

गणेशोत्सव नंतर सार्वजनिक दुर्गादेवी मंडळाच्या विसर्जन सोहळयात विना डिजे मिरवणूक काढण्यात आली यावेळी महिला भाविक भक्तांनी मोठया संख्येने सहभागी घेऊन ढोलताशांच्या गजरात दांडीया,गरबा खेळाला,तर विविध भागात फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली.

# शिवसेना च्या वतीने वसरणी येथील पुरग्रस्त बाधीत नागरीकांना अन्नदान किटचे वाटप

नवीन नांदेड -शिवसेना शिंदे गटाचे शहर प्रमुख सुहास खराणे यांनी पूरग्रस्त बाधीत वसरणी येथील पंचवटी व शंकरनगर भागातील नागरीकांना अन्नधान्य किट वाटप करून सामाजिक बांधिलकी जोपासणारे कार्य केले आहे.

नावा मनपाच्या हद्दीत असलेल्या गोदावरी नंदीच्या पात्रालगत असलेल्या पंचवटी व शंकरनगर भागात गोदावरी नदी आलेल्या पुरामुळे पंचवटी व शंकरनगर भागातील अनेक निवासस्थानी पाणीच पाणी झाल्याने जिवनाशयक वस्तू सह संसार उपयोगी वस्तूचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते,तर निवासस्थानी शिरलेले पाणी तिनं ते चार दिवस राहिल्याने नागरीकांना मनपाच्या वतीने राहण्याची व झोपण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

शिवसेनेचे उपमुख्यमंत्री एकनाथ भाई शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेचे उपनेते आ. हेमंत पाटील यांच्या आदेशानुसार नांदेड दक्षिण




विधानसभा मतदार संघाचे आ. आनंदराव पाटील बोंढारकर व नांदेड दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे, तालुका प्रमुख उध्दव पाटील शिंदे यांच्या सहकार्याने शिवसेना शहरप्रमुख सुहास पाटील खराणे यांनी पंचवटी व शंकरनगर वसरणी भागातील पुरग्रस्त बांधीत नागरीक महिलांना ४ ऑक्टोबर रोजी रामराव पाटील बोढांरकर,राज पाटील बोढारकर यांच्या उपस्थितीत अन्नधान्य किटचे वाटप जवळपास पन्नास नागरीकांना करण्यात आले, शिवसेना शिंदे गटाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जोपासत केलेले हे कार्य उल्लेखनीय असल्याचे सांगितले..

# जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र नांदेड येथे ७ ऑक्टोबर रोजी राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन

नांदेड : -श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाचे जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र, सिडको, नवीन नांदेड आणि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स (मास्वे) यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ७ ऑक्टोंबर २०२५ रोजी सकाळी ठीक १० वाजता शाश्वत विकासासाठी समाजकार्य हस्तक्षेप संधी व आव्हाने या विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कर्मयोगी डॉ. नानासाहेब जाधव तर चर्चासत्राचे उदघाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रो. डॉ. अशोक महाजन यांच्या शुभहस्ते होणार असून, प्रो.डॉ अंबादास मोहिते, समाजशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग तथा संस्थापक अध्यक्ष महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स 'मास्वे' बीज भाषण करणार आहेत. कार्यक्रमास सौ शांतादेवी जाधव ,उपाध्यक्ष श्री. सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ नांदेड, अडव्होकेट श्रीनिवास जाधव, प्रो.डॉ.पी.एम.शहापूरकर छत्रपती संभाजीनगर, प्रो. डॉ. डी. एन. मोरे व्यवस्थापन परिषद सदस्य, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. मराठवाड्या सारख्या मागास भागांमध्ये समाजकार्याचे दर्जेदार शिक्षण देण्यात येणारे महाविद्यालय आज सर्वत्र नावलौकिक म्हणून ओळखल्या जात असून, आज जगात संयुक्त राष्ट्राने २०३० पर्यंत साध्य करायची १७ शाश्वत विकास उद्दिष्टे स्वीकारली आहेत.ही शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यामध्ये समाजकार्य शिक्षणाचे महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकते म्हणून यात सखोल चिंतन व संवाद होणे अपेक्षित आहे या दृष्टीने ह्या राज्यस्तरीय चर्चासत्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या चर्चासत्राच्या माध्यमातून शास्वत विकास उद्दिष्टांच्या पूर्ततेत समाजकार्य शिक्षणाची अधोरेखित भूमिका स्पष्ट होणार आहे. या राज्यस्तरीय चर्चा सत्रामध्ये राज्यातील वेगवेगळ्या भागातून १०० पेक्षा अधीक संशोधक आपले संशोधन पेपर सादर करणार आहेत.

या राज्यस्तरीय चर्चासत्राचे मुख्य आयोजक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नरहरी पाटील संयोजक डॉ.अंबादास कर्डिले,सहसंयोजक डॉ.मेघराज कपूर,समन्वयक प्रा. गोपाल बडगिरे यांनी नांदेड मध्ये होणाऱ्या राज्यस्तरीय चर्चासत्रामध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन सर्व संशोधक विद्यार्थी प्राध्यापक अभ्यासू मंडळी यांना केले आहे.

# पत्रकारांनी सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवत विकासासाठी सकारात्मक लिखाण करावे

## पत्रकार संघाच्या संपर्क कार्यालय उदघाटनप्रसंगी आ.डॉ.राठोड यांचे प्रतिपादन

मुखेड / प्रतिनिधी

पत्रकारांनी संपर्क कार्यालयाच्या माध्यमातून सकारात्मक लिखाण करावे सर्व सामान्यांचे प्रश्न सोडवत विविध विकास कामांची माहिती सर्व सामान्य नागरिकांना मिळावी म्हणून पुढाकार घ्यावा. समाजाभिमुख लिखाण करून जनजागृती करावी असे प्रतिपादन आ.डॉ तुषार राठोड यांनी केले आहे.ते मुखेड तालुका मराठी पत्रकार संघाच्या संपर्क कार्यालयाच्या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी बोलत होते.हा सोहळा विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत विजयादशमी दिनी थाटात संपन्न झाला आहे.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद संलग्न,मुखेड तालुका मराठी पत्रकार संघाच्या संपर्क कार्यालयाचे उदघाटन व नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकारांना ओळखपत्र वाटप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष गंगाधर राठोड हे होते तर उद्घाटक आ.डॉ.तुषार राठोड,प्रमुख अतिथी म्हणून नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे,माजी जि.प.सदस्य दशरथराव लोहबंदे,माजी सभापती खुशाल पाटील उमरदरिकर,बळवंतराव पाटील बेटमोगरेकर,मुखेड भूषण डॉ.दिलीप पुंडे,नायब तहसीलदार एस.एस.मामीलवाड,गटविकास अधिकारी चंद्रशेखर रामोड, वैद्यकीय अधिक्षक डॉ.बालाजी गरुडकर,माजी



नगराध्यक्ष बाबुराव देबडवार,माजी उपनगराध्यक्ष जगदीश बियाणी, डॉ.अशोक कौरवार,डॉ.श्रीहरी बुडगेमवार,माजी नगरसेवक नासेरखाँ पठाण,उत्तम बनसोडे, जेष्ठ वृत्तपत्र वितरक शंकर संगेवार,संग्राम आप्पा मळगे, रिपब्लिकन सेनेने अनिल सिरसे सह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आ राठोड पुढे बोलताना म्हणाले की पत्रकारांनी संपर्क कार्यालय सुरू करून तालुक्यात चांगली सुरुवात केली आहे.संपर्क कार्यालय आज जरी खाजगी जागेत सुरू करण्यात आले असले तरी आगामी काळात पत्रकारांचे स्वतःचे पत्रकार भवन असावे यासाठी स्वर्गीय गोविंदराव राठोड सांस्कृतिक सभागृहाच्या शेजारी जागा उपलब्ध करून त्या ठिकाणी पत्रकार भवन करण्यासाठी आगामी काळात पुढाकार घेणार असल्याचे सांगितले.पत्रकारांनी सकारात्मक लिखाणास प्राधान्य द्यावे तालुक्यातील विविध विकास कामाची माहिती सर्वसामान्य नागरिकांना मिळावी म्हणून पुढाकार घ्यावा असे मत व्यक्त केले.यावेळी डॉ.दिलीप पुंडे, पत्रकार संघाचे अध्यक्ष महेताब शेख,यशवंत बोडके, राजेश बंडे यांनी मनोगत व्यक्त केले आहे. नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने तालुक्यातील पत्रकारांना ओळखपत्र वितरण करण्यात आले आहे.यावेळी मुखेड तालुक्यातील बाराळी, जांब,मुक्रमाबाद येथील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. तालुक्यातील पत्रकार बांधवांना आ.डॉ.तुषार राठोड,जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे सह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ओळखपत्र वितरण करण्यात आले.पत्रकार संघाच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवरांचे सन्मानचिन्ह,शाल, पुष्पगुच्छ व पुष्पहार देवून यथोचित सन्मान करण्यात आला.

# व्हॉईस ऑफ मीडिया नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्षपदी तुकाराम सावंत, यांची निवड ..

नांदेड :- आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्य करणाऱ्या व्हॉईस ऑफ मीडिया पत्रकार संघाच्या नांदेड जिल्हा कार्यकारिणीचा विस्तार करण्यात आला असून, यामध्ये दोन जिल्हाध्यक्ष,चार उपजिल्हाध्यक्ष अशी निवड प्रक्रिया संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप भाई काळे यांच्या सुचने नुसार नांदेड जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश जोशी यांनी ही निवड पार पाडली



यावेळी नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्षपदी तुकाराम सावंत यांची निवड करण्यात आली आहे. नवीन नांदेड भागातील सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील अग्रेसर व्यक्तिमत्त्व असलेल्या तुकाराम सावंत यांची नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष पदी तर उपजिल्हाध्यक्ष गोविंद मुंडकर, यांची निवड करण्यात आली आहे.

या निवडीबद्दल व्हॉईस ऑफ मिडीया पत्रकार संघाचे जिल्हा सचिव अनिल पाटील धमने . नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष तिरूपती पाटील घोगरे, रमेश ठाकूर,किरण देशमुख,सारंग नेरलकर यांच्या सह विष्णुपुरी नांदेड येथील काळेश्वर मंदिर समितीचे सचिव शंकरराव हबर्डे यांनी सत्कार करून जिल्हाध्यक्ष सावंत यांचे अभिनंदन करून स्वागत केले आहे,या निवडीबद्दल सावंत यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.